१८२७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १८४५

[redacted]

# संग्राम-गीत.

REFBK-0002140
REFBK-0002140

किंमत ८ आणे.

॥ ॐ नमःश्रीअंबिकायै ॥

### मराठ्यांचें

# संग्राम-गीत.

लेखक

दु. आ. तिवारी.

( प्रथमावृत्ति प्रती ५००. )

REFBK-0002140

REFBK-0002140

दत्तात्रेय [illegible],
मालक, " धनंजय " प्रेस;
खानापूर—बेळगांव.

( ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

सन १९२२.

किंमत ०८ आणे.

हें पुस्तक दत्तात्रय गोविंद सडेकर,
यांनी
आपल्या 'धनंजय' छा० छापिलें
व
दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी, यांनीं
पिंप्राळें-पूर्व खानदेश येथें प्रसिद्ध केलें.

27.40.

# "आत्मनिवेदन"

या पुस्तकास प्रस्तावना नाहीं. ! मलाही ती लिहावयाची नाहीं. प्रस्तावना नाहीं यांतच प्रस्तावनेची स्मृति मात्र आहे.

पुष्कळ विद्वान रासिकांस या ऐतिहासिक कविता आवडल्या व तीन तीन चार चार कवितांचें एकीकरण करून ग्रंथरूपानें हीं पुष्पें काढावीं ह्मणून त्यांनीं पत्रद्वारें व समक्ष सूचना केल्या. मी सर्वच कविता एकत्र केल्या अर्थात् यांत काव्यरत्नमालेंतीलही कांहीं प्रकरणें घेतलीं व पुस्तकाची किंमत ठेववेल तितकी कमी ठेविली.

"या पुस्तकांतील कांहीं थोड्याप्रकरणांचा समावेश 'संग्रामगीतें' या नांवांत होत नव्हता ह्मणून 'या पुस्तकास' 'ऐतिहासिक स्मृतिगीतें' हें नांव योजिलें होतें परंतु पहिलें नांव मुद्रित होऊन गेलें ह्मणून तेंच कायम केलें."

धनंजय प्रेसचे मालक श्रीयुत दत्तोपंत सडेकर यांनीं यापूर्वी '**मनोहरलीला**' व '**प्रसन्नराधा**' या माझ्या दोन खंडकाव्यांची सुबक छपाई केली नंतर माझे

परमस्नेही श्रीयुत केशव महादेव सोनळकर वकील—जळगांव यांच्या '**अमृत तुषार**' पुस्तकाचें बील तर हिशेब न मागतां चुकतें करण्यांत आलें! या अनुभवानें आजच्या या पुस्तकाचा श्रीयुत सडेकरांशीं मी भावही ठराविला नाहीं. उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या या प्रेमसंबंधाचें श्रेय मी श्रीयुत दत्तोपंत यांसच देतों व त्यांचे आभार मानतों.

रसिकांचा नम्र,

दु. आ. तिवारी.

माझे प्रियमित्र,

एकनाथ यादव निफाडकर,

संपादक, "लोकमान्य"


यांस

त्यांच्या आवडीच्या या कविता मी प्रेमानें

अर्पण करितों.

"जें ज्यास प्रिय तें त्यास अर्पण करण्यांत जें समाधान वाटतें तें माझ्या प्रिय मित्रानें माझ्या वाट्यास दिलें आहे"

दु. आ. तिवारी.



स्वर्गलोक सुरलोकांचा
पाताल नागलोकांचा
अभिमान तयांना त्यांचा
अमुचाही हा अभिमान-हिंदूंचा हिंदुस्थान !

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. | प्रसिद्धीचें स्थान. |
|---|---|---|
| १ हिंदूंचा हिंदुस्थान | १ | ... |
| २ मुसलमान बंधूची हिंदुभगिनी | ४ | ... |
| ३ संताजीची घोड दौड ... | ८ | ... |
| ४ शाहूची यवनी माता | १२ | लोकमित्र |
| ५ मोहरा इरेला पडला | १७ | संदेश |
| ६ कुंभेरीची भंबेरी | २१ | कर्मयोगी |
| ७ बळवंतराव मेहेंदळे | | ... |
| १ विषय-सूत्र | २९ | ... |
| २ स्वर्गांत भेट होईल | ३५ | ... |
| ३ विजयाच्या द्वारीं अडला | ३९ | ... |
| ८ बेइमान होऊं कैसा | ४४ | राजकारण |
| ९ गारदीकटोनी मेला | ४८ | ,, |
| १० विश्वाससोडुनी गेला | ५३ | विविध ज्ञानविस्तार |
| ११ गिलचा खाशानिशीं मारीन | ५७ | ... |
| १२ धन्यजनाने जनकोजीची | ६१ | विविध ज्ञानवि० ज्युबिली ग्रंथ |
| १३ भाऊ! भाऊ! | ६९ | ,, |
| १४ वडगांवावरचा वीर | ७५ | प्रमोद |
| १५ एक काळ ऐसा होता | | |
| भाग १ ला | ८० | कर्मयोगी |
| भाग २ रा | ८२ | ,, |
| भाग ३ रा | ८५ | प्रफुल्लता |
| भाग ४ था | ८८ | कर्मयोगी |
| १६ केवळ देशा करितां | ९२ | ... |
| १७ दास्य हेंच ना त्वध्येय | ९५ | तरुण भारत |

# 'मनोहरलीला' व 'प्रसन्नराधा'

## या खंडकाव्यांवरील

## प्रमुख वृत्तपत्रकार व मासिककार यांचे अभिप्राय.

**केसरी:**–( ता. २८।१२।२० )

**प्रसन्नराधा:**–"या काव्यांत राधा हिचें कृष्णाच्याठायीं कसें उच्च दर्जाचें पवित्र प्रेम वसत होतें हें कवीनें मोठ्या कुशलतेनें दाखविलें आहे. काव्यांत प्रतिभा व भाषा चांगली साधली आहे."

**स्वराज्य:**–( ता. ४।१०।२० )

**१ मनोहरलीला**
**२ प्रसन्नराधा** } "दोहोंमधील कविता अर्थ समजण्याला सोप्या असून रसोत्पादक, प्रेमळ, मधुर आणि काव्यमय अशा आहेत"

**राजकारण:**–( ता. १७।७।२१ )

**मनोहरलीला:**–" दौलताबादच्या राज्याच्या वेळचें एक रमणीय कथानक या काव्यामध्यें कवीनें ग्रथित केलें आहे. रा. तिवारी यांच्या कवित्वशक्तीची ओळख महाराष्ट्रीयांस बरीच झालेली आहे. रा. तिवारी यांच्या लेखणींतून उतरलेलें हें ४० पृष्ठांचें लहानसें काव्य सरस व चटकदार वठलें आहे. मनोहर व लीला हें शोकरसपूर्ण कथानक वाचकांच्या हृदयास चटका लावल्याशिवाय सोडणार नाहीं"

**विविधज्ञान विस्तार** ( दिसेंबर १९२० चा अंक )

**मनोहरलीलाः**–“ प्रस्तुत काव्याचें कथानक रजपूतकालीन असून त्यांत पातिव्रत्याच्या संरक्षणासाठीं लीलेनें दाखविलेलें अलोट शक्तिवैभव फारच बहारीनें वर्णन केलें आहे. काव्य एकंदरींत प्रसन्न आहे!’

**प्रसन्नराधाः**-“ यांत एका काल्पनिक कथानकाची उभारणी केली असून आत्यंतिक प्रेमाचा विजय शेवटीं कसा होतो याचें शब्दचित्र बऱ्याच समाधानकारकरीतीनें रंगवलेलें वाचकांस दिसेल.

**महाराष्ट्र साहित्य** (जाने. व फेब्रु. १९२० चा जोड अंक) **मनोहरलीलाः**–“ एकंदरींत ह्या काव्याचें कथानक जसें अगदीं साधें तशीच याची भाषा सरळ आणि यांतील प्रसंगही अगदीं सहजीं घडून आलेले असतांही हें वाचनीय असून संग्राह्य आहे. असें आह्मास वाटतें ”

**प्रसन्नराधाः**–‘या काव्याचें कथानक काल्पनिकच पण सद्यः कालीन आहे. याची भाषा पहिल्या सारखीच जरी साधी आहे; तरी विशेष चटकदार आहे. तिसाव्या कडव्यांत गोड शेवट झाला आहे व ३१ व्या कडव्यांत गोड उपदेश आहे. **मराठी शिक्षक** ( फेब्रु. १९२२ )

**प्रसन्नराधाः**–“ या काव्याचें कथानक बरेंच साधें असून पात्रांच्या स्वभावांचें वर्णनही बरें साधलें आहे. स्थलवर्णन व ऋतुवर्णनहीं ही जागोजाग साधलीं आहेत.

शृंगार व करुण हे रस मुख्यत्वें यांत आहेत. ठिकठिकाणीं सुभाषितें गुंफून दिलीं असून....तीं मोठ्या ठशांनीं छापलीं आहेत....एकंदरींत हें काव्य चांगलें आहे यांत शंका नाहीं.

**कर्मयोगी** ( आक्टो. १९२१ )

**१ मनोहरलीला**
**२ प्रसन्नराधा** } " मनोहरलीलेचें कथानक सुंदर असून कवींनीं तर त्यांत बहार केली आहे. त्याच प्र. प्रसन्नराधेंतील प्रेमाचें-पवित्र प्रेमाचें -जें दृश्य दाखविण्यांत आलें आहे त्यावरून त्यांचें पावित्र्य व दिव्यत्व चांगलेंच दृग्गोचर होत आहे. प्रेमविडंबन करणाऱ्यांना हें पुस्तक ह्मणजे आदर्श होय. श्रीयुत तिवारी यांच्या कवित्वासंबंधीं लिहावें परंतु श्री. तिवारी यांची ओळख आपल्या काव्यानें कर्मयोगीच्या वाचकांस झाली आहे. तरी देखील आह्मी एवढेंच लिहूं शकतों कीं, खऱ्या कवीस लागणारी प्रतिभा, भाषा आदि सामुग्री त्यांच्याजवळ भरपूर आहे "

॥ ॐ नमश्चंडिकायै. ॥

मराठ्यांचें

# संग्राम-गीत.

## "हिंदूंचा हिंदुस्थान. !"

(चाल—उद्धवा शांतवन कर जा.)

ब्राह्मण ब्राह्मणेतर वा-मुसलमान हिंदू जैन
पारशी शीख वा बौद्ध-भिन्नधर्मश्रद्धावान
आह्मीं भारत-भू-पुत्र-अंतरांत जाणूं खूण.
बंधु बंधु यांच्या कलहीं
जरि शिरला कोणी गेहीं
उसळुन बोलूं सारेही.
"पाय काढ गेहांतून !-हिंदूंचा हिंदुस्थान ! " १
" दोघांचें भांडण लाभ-तिसऱ्याचा,"-ही ह्मण ठावी
ना तुला, न मजला पोळी-कां श्वानाला घालावी ?
नीच वृत्तीनें परहस्तीं-जन्मभूमि केवीं द्यावी ?

स्वर्गलोक सुरलोकांचा
पाताल नागलोकांचा
अभिमान तयांना त्यांचा
अमुचाही हा अभिमान-' हिंदूंचा हिंदुस्थान '! २
उन्नत त्या हिंदुकुशाला-हिंदिमहासागर त्याला
वा प्रचंड सिंधुनदाला-ब्रह्मपुत्र-नद जो त्याला
जा पुसा, तुह्मा ऐकाया-येईल श्रुतिवचमाला
" जेथलें ज्ञान मिळवोनी
जाहलें जगत् सज्ञानी
यद्यशो-दुंदुभि श्रवणीं
ऐकाया येतो अजुन-हिंदूंचा हिंदुस्थान ३
जो हिमाचलानें शोभे-हिमागिरिही ज्यानें शोभे
जो भागीरथिनें साजे-भागीरथी ज्यानें साजे
जो भरतकीर्तिनें गाजे-भरतकीर्ति ज्यानें गाजे
धर्माच्या क्रांतीकालीं
विश्वनाथ वेळोवेळीं
प्रगटला जिथें जयशाली
कवण देश कीर्तीवान?-हिंदूंचा हिंदुस्थान. ४
यत्कीर्ती-हंसी उठली-ब्रह्मलोकिं जाउन ठेली
वाहन जो हंस विधीचा-त्याशीं रत होउन वळली
येतांना स्वर्गंगेंत-ती प्रसूत साध्वी झाली
धवलांग चंद्र हा नोहे
हें तदंड विलसत आहे

पितृलोक जयावर मोहे
ऐसा सद्यश-संपूर्ण-हिंदूंचा हिंदुस्थान ५

भू-ग्रह-गोलाच्या भंवती-घेऊन उपग्रह-रूप
कां प्रदक्षिणा घालितसे-रजनीचा नाथ समीप
ज्योतिर्विद् ग्रहविद्ज्ञानी-कारणें वदोत अमूप
मज कारण वाटे एक
माणि महि-कंठांत सुरेख
भाळला तयास शशांक
तो मणी कोणता छान-हिंदूंचा हिंदुस्थान ६

भारत-भूमीच्या पोटीं-जाहला जयांचा जन्म
जाहल्या तदंकीं ज्यांच्या-शैशव-लीला संपूर्ण
हृदयांत खळाळे रक्त-पाहतां तिचें दुर्दैन्य
पुत्र ते तिचे झटतांना
जे पराभिलाषी त्यांना
झटती त्या दुर्वृत्तांना
इतुकें हि नसावें ज्ञान-हिंदूंचा हिंदुस्थान. ७

---

# मुसलमान बंधूची हिंदु भगिनी !

## “ सांभाळा प्राणविसावा ! ”

रायगड किल्ला स्वाधीन करितांना येसूबाईनें झुल्फिकरखानाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून बाल-शाहूस त्याच्या हवालीं केलें. त्यानेंही हातीं कुराण घेऊन तिला बहीण ह्मटलें. व तें नातें शेवटपर्यंत पाळिलें.

वाजवून गेला डंका-शिवराज पितामह ज्याचा
धर्मासाठीं यज्ञनकें-बाळि दिधला स्वप्राणाचा
यशः सौरभीं रमुनी-गातील कवींच्या वाचा
नातु तो शूरवीराचा
पुत्र तो धर्मशूराचा
स्वामी या रायगडाचा
म्यां कैसा हातीं द्यावा? सांभाळा प्राणविसावा १

घालती पन्हाळीं वेढे-वेडे त्यांना ठरवोनी
छाती उडवित जाणारा-शत्रूच्या छाती वरुनी
ठेंचून करी रांगोळी-रांगण्यावरी खेंचोनी
तो भीष्म महाराष्ट्राचा
समयोचित बलधैर्याचा
हा वंशज हाय! त[illegible]ा!
लावितें हात मी दैवा! सांभाळा प्राणविसावा २

मी सून बरें कोणाची! जों विचार करित्यें चित्तीं
मी पत्नि बरें कोणाची! जों प्रश्न ठवित्यें पुढतीं
हा समय करूं देईना-मज मान खालची वरती
अबलांचे असतिल मानी
त्यांनींच मिशी ठेवोनी
मिरवावें 'पुरुष' ह्मणोनी
शूर धर्म शूरां ठावा-सांभाळा प्राणविसावा ३

जीवितेश्वराचा घात-वज्राघातच शिरिं गमला
सुकली न अश्रुची धारा-अद्याप पदर हा ओला
तों भोग पारतंत्र्याचा-वाढून पुढें हा आला
ऐशी न कोणती जननी
सुत आर्पि परां लागोनी
समरीं विश्वास धरोनी
अर्पिते जिवाचा ठेवा-सांभाळा प्राणविसावा ४

हा होइल राजविलासी-जन्मतां जोतिषी वदले
दीर्घायुषि होइल भोगी-रेखाशास्त्रज्ञ म्हणाले
बसवील घडी राज्याची-संत साधु बोलुन गेले
सर्वांनीं शुभ वर्तविलें
हें अशुभ वदाया आलें
काळिज पोळुनी गेलें
तुमचाच अतां ओलावा-सांभाळा प्राणविसावा ५

भडभडून गेतें पोटीं-दुःखाचें गरळ न साहे!
ओकूं कोणाच्या जवळीं-कोण प्रेमीजन आहे!

रोधून पाहतें कष्टें-परि मातृहृदय ना राहे
अंगावरतीं खेळविलें
कटिवरतीं घेऊन फिरल्यें
पाळण्यांत गाणें ह्मटलें
आतां आपण रक्षावा-सांभाळा प्राणविसावा ६

परवाच्या तुमुल रणांत–जैं हताश सैनिक झाले !
परतले गडकरी ऐसें-कोणी येउन सांगितलें !
सिंहासन सोडुन उठला-आरक्त करोनी डोळे !
शरिरीं असुनी सुकुमार
घेऊन ढाल तरवार
झाला युद्धास तयार
हा रणसिंहाचा छावा-सांभाळा प्राणविसावा ७

जोंवरी करीं तलवार-तोंवरी शत्रुशीं दावा
टाकून शस्त्र जो आला-त्याशीं न करावा कावा.
निर्धौतयशःपट ज्याचा-प्रकटिती वीर सद्भावा
साम्राज्यधुरंधर त्यांच्या–
सत्यप्रिय असती वाचा
कृति करुन दाविती साच्या
बोललां तशी कृति दावा-सांभाळा प्राणविसावा ८

विश्वास न येता जरिही-जातिचे मराठे आह्मी !
मारतां मारतां मरतों-देशाच्या येतों कामीं !
खंजीर-युक्त ललनांचे चमकते हात संग्रामीं !

विश्वासीं त्यजिला मान.
मानेंत घातली मान.
दोघांत ' राम रहिमान '
राखोनी आपुल्या नांवा-सांभाळा प्राणविसावा ९

जर असेल घात करावा आहेच उभें हें पोर
वचनभंग करणें चित्तीं-आहेच करीं समशेर !
होऊंद्या. खानसाहेब ! सोक्ष कीं मोक्ष निर्वैर
मक्केचा वारा मजशीं
गुणगुणतो कीं कानाशीं
" झुल्फिकरखान विश्वासी. "
आठवून तिथल्या देवा-सांभाळा प्राणविसावा १०

मुसलमान बंधू झाला-बहिण ती हिंदु धर्मांची
हातांत कुराण-ग्रंथ वाहतो शपथ तो त्याची
संकटांत एकी व्हावी-रीत ही हिंदुयवनांची
" हें कुराण बघ उचलोनी
मानिली तुला मी भगिनी
हो विशंक अंतःकरणी
सांगणें नको या भावा-सांभाळा प्राणविसावा " ११

# " संताजीची घोडदौड "

संभाजी महाराजांच्या वधानंतर येसूबाई व बालशाहू मोगलांच्या ताब्यांत सांपडले. रायगडची गादी जिंजीला गेली! स्फुरण पावलेली मोंगल सेना ज्या त्या किल्यावर हिरवें निशाण फडकावूं लागली! ती वेळ मोठ्या आणी बाणीची होती. धनाजी जाधव व संताजी घोरपडे या रण-झुंजारांनीं आणि प्रल्हाद निराजी सारख्या राजकारणी पुरुषांनीं त्या वेळीं मराठी राज्याची इमारत कृतनिश्चयानें सांवरली. संताजी घोरपड्यांनीं आपल्या घोडदळाच्या साह्यानें औरंगजेबाला किती बावरून सोडिलें होतें तें इतिहासज्ञास कांहीं सांगावयास नको.

तळ हातीं शिर घेउनिया-दख्खनची सेना लढली
तरि विजयी मोंगल सेना-ना नामोहरम जहाली
पडली मिठि रायगडाला-सोडवितां नाहीं सुटली

राजरत्न राजाराम
कंठास त्यास लावून
जिंजीवरती ठेवून

परते सर सेनापतीची-घोडदौड संताजीची १

मिरजेवर पातशहाचीं-शहाजणें वाजत होतीं
हाणिल्या तयांवर टापा-फोडून टाकिलीं पुरतीं
मारिली टाच तेथून-घेतला पन्हाळा हातीं

तों कळलें त्या वीराला
जिंजीला वेढा पडला
पागा घेवोनी वळला
चौखूर निघे त्वेषाची-घोडदौड संताजीची २
झुल्फिकरखान लढवय्या-कातरलीं झुल्फें त्याचीं
धुळधाण केली तेथें-किति अमीर उमरावांची
उसळली तिथोनी मांड-मग त्या कर्दनकाळाची
जिंजीचा धुरळा मिटला
जालना प्रांतिं तो उठला
चोळितो शत्रु नेत्राला
गेली हां हां ह्मणतांची-घोडदौड संताजीची ३
वाजल्या कुठें जरि टापा-धुरळ्याची दिसली छाया
छावणींत गोंधळ व्हावा-" संताजी आया! आया! "
शस्त्रांची शुद्धी नाहीं-धडपडती ढाला घ्याया
रक्तानें शरिरें लाल
झोंपेनें डोळे लाल
जीवाचे होती हाल
ऐशी शत्रूला जाची-घोडदौड संताजीची ४
'धों धों' वाहे गिरसप्पा-त्याला प्रतिसारिल कोण?
'सों सों' शिशिराचा वारा-रोधील तयाला कोण?
हिमशैल-खंड कोसळतां-त्याला प्रतिरोधिल कोण?
होता जो गंगथडीला
आला तो भीमथडीला

एका दिवसांत उडाला
करि दैना परसेनेची-घोडदौड संताजीची ५
पुरताच बांधिला चंग-घोड्यास चढविला तंग
सोडी न हयाचें अंग-भाला बरचीचा संग
नौरंगाचा नवरंग-उतरला जहाला दंग
तुरगावर जेवण जेवी
तुरगावर निद्रा घेई
अंग ना धरेला लावी
भूमीस खूण टापांची-घोडदौड संताजीची ६
न कळे संचरलें होतें-तुरुगांसाहि कैसें स्फुरण
उफळाया बघती वेगें-रिकिबींत ठेवितां चरण
जणु त्यांसाहि ठावें होतें-युद्धीं "जय किंवा मरण"
शत्रूचे पडतां वेढे
पाण्याचे भरतां ओढे
अडती न उधळती घोडे
ऐशी चाले शर्तीची-घोडदौड संताजीची ७
नेमानें रसद लुटावी-नेमाजी शिंदे यांनीं
हय गज सांपडती तितुके-न्यावे हैबतरावांनीं
वाटोळें सर्व करावें-आटोळे सरदारांनीं
"खाड खाड" उठती टापा
झेंपावर घालीत झेंपा
गोटावर पडला छापा
आली ह्मणती काळाची-घोडदौड संताजीची ८

चढत्या घोड्यानिशीं गेला—बेफाम धनाजी स्वार
करि कहर बागलाणांत—ओली न पुशी समशेर
बसवितो जरब यवनांना-बेजरब रिसालेदार
वेगवान उडवित वाजी
तोंडावर लढतो गाजी
धाउन आला संताजी
पळती मोंगल बघतांची-घोडदौड संताजीची ९

नांवाचा होता ' संत'-जातीचा होता शूर !
शीलाचा होता ' साधू'-संग्रामीं होता धीर !
हृदयाचा ' सज्जन' होता-रणकंदनिं होता क्रूर !
दुर्गति ती संभाजीची
दैना राजारामाची
अंतरीं सर्वदा जाची
उसळे रणशार्दूलाची-घोडदौड संताजीची १०

मर्दानी लढवय्यांनीं-केलेल्या मर्दुमकीचीं
मर्दानी गीतें गातां-मर्दानी चालीवरचीं
कडकडे डफावरि थाप-मर्दानी शाहीरांची
देशाच्या आपत्कालीं
शर्थीचीं युद्धें झालीं
गा शाहीरा ! या कालीं
ऐकूं दे विजयश्रीची-घोडदौड संताजीची ११

# " शाहूची यवनी माता."

राजारामाच्या मृत्यूचें वर्तमान शाहूला कळलें त्यावेळीं त्याला अतोनात दुःख झालें. केव्हां ना केव्हां तरी काका आपली सुटका करतील अशी त्यास आशा होती, ती समूळ नष्ट झाली. आतां आपणास शेवटपर्यंत मोंगलांच्या अटकेंत रहावें लागणार या हृद्रोगानें त्याचें मनःस्वास्थ्य नाहींसें झालें व शेवटीं त्याला मोठा ताप येऊं लागला. येसूबाई व बेगम (रोषनार) साहेब फारच घाबरल्या. बेगम तर शाहूचा बिछाना सोडीनाशी झाली; व ती देवाची करुणा भाकूं लागली. औरंगजेबाला ती गोष्ट कळली तेव्हां तो स्वतः शाहूच्या समाचाराला गेला व त्याच्या आंगावरून हात फिरवून म्हणाला "तुमारा चिच्या मरगया उसवास्ते तबियत बिघड गई? तुम हमारे बेटीके बेटे हो. चिंता मत करो. तुमारा राज्य तुमकू देऊंगा." पुढें बेगमेच्या अविश्रांत खटपटीनें शाहूस आराम पडला.

(गोगटेकृत शाहू म० चें चरित्र. पान. २८.)

काकांचा ऐकुन मृत्यू-शाहूचा खचला धीर
आशेचा तुटला तंतू-मुक्तीची इच्छा दूर
शय्येवरि हृद्रोगानें-तनु झाली क्षणभंगूर

तो रायगडाचा कान्हा
येसूबाईचा तान्हा
तापांत कण्हत असतांना

तळमळते चिंतायुक्ता-रोषनार बेगम माता १

" ध्यास सोड वेड्या जीवा!-भेटतील कैचे काका
स्वातंत्र्य कोठचें दैवीं-बंदिवास ठरला पुरता
वागवो कसाही शाहा-तोच तात बंधू आतां
अंतरांत कढ दुःखाचे
नेत्रांत नीर शोकाचें
नुमटती शब्द शाहूचे
अधिक बिंदु गळती, पुसतां-रोषनार बेगम माता २
जन्म दात्रिला पाहातों-तों हृदय भरोनी येतें!
प्रेमदात्रिला पाहातों-तों अखंड धारा गळते!
" रडुं नको, नको मज रडवूं-सांग काय तुजला गमलें?
धर्माच्या पुत्रासाठीं
नौरंगशाहाची बेटी
करिल शक्य साऱ्या गोष्टी "
समजावी तत्सुखनिरता-रोषनार बेगम माता ३
प्रीतीची सरिता जेथें-जातिभेद कुठचा तेथें?
मायेचा सागर जेथें-धर्मभेद कुठचा तेथें?
एकात्मभावना होतां-रक्तही वितळुनी जातें
ही दिव्य देवता-नीती
जी साधुसंत आदरिती
ती निर्मल योषिज्ज्योती
दाखवी सुकीर्ति विहिता-रोषनार बेगम माता ४
घालोनी अपुला हात-यसूबाईच्या कंठीं
भगिनीला भगिनी सांगे-ती समजूतीच्या गोष्टी

परि तिचाच दाटुन कंठ-फुटती न शब्द तैं ओष्टीं
वत्सलता स्फुंदत होती
प्रीतीला भाषा नव्हती
तिजसवें करी रुदना ती
कवण प्रीतीची वनिता ?-रोषनार बेगम माता ५

" दुग्धाचा एकाहि घोट-बाळ कांहीं प्याला नाहीं
टाकिलें बळें तोंडांत-कंठांत उतरलें नाहीं
हीं पात्रांतिल पक्कान्नें-मज रुचतिल कैंवी बाई ! "
मस्तकीं ठेवुनी हात
अनिमिष त्याला पाहात
अश्रूंचीं फुलें वाहात.
निकटीं बैसे दुःखार्ता-रोषनार बेगम माता ६

ऐवढें राजमंदीर-तिज अरण्य भासत होतें
उपभोग्य वस्तू असतांना-मन विषण्ण झालें होतें
नश्वरता बाणुन चित्तीं-ऐश्वर्य न रमवि मनातें
रात्रंदिन बसुन उशाशीं
प्रार्थोनी परमेशाशीं
करि नाना उपचारांशीं
ती सम्राटाची दुहिता-रोषनार बेगम माता ७

शेवटचा सुटला घाम-वसनें तीं चिंब जहालीं !
देहास लावितां हात-शीतता दिसे आलेली !
नाडीला लावून हात-हकिम मान खालीं घाली !

भेसूर दुःख तेव्हांचें
जननीचें कीं यवनीचें
वर्णावें तरि कोणाचें?
कष्टली तनूस न बघतां-रोषनार बेगम माता ८

स्वाभाविक अदय मनाचा-नौरंग शहा विख्यात
ही प्रीतिशील उपजावी-कन्या त्याच्या उदरांत!
कोळशांत हिरकणि जैशी-किंवा नलिनी चिखलांत!
काष्ठाला अंकुर फुटला!
दगडाला पाझर सुटला!
शाहा कळवळुनी आला!
थोपटीत होती पुत्रा-रोषनार बेगम माता ९

कठिण शैल द्रवतो चित्तीं-सरितेच्या प्रेम जलानें
मेघाला सुटती धारा-चमकतां वीज तेजानें
दिल्लीश्वर हळहळला तो-तैसा अंतःकरणानें
"अल्लानें खैर करावी
दख्खनचा राजा भावी
उपभोगो राज्य सुदैवी
दुहिता नच, कीर्ती सरिता-रोषनार बेगम माता १०

सर्व सदय झाले होते-सर्वेशाहि निर्दय नव्हता
हरएक मंगलाकांक्षी-हरिही न अमंगल-कर्ता
सकलेच्छा-'संकट जावें'-सकलेशाहि संकट-हर्ता

यसुबाईचें सुकृत
निजलेलें उठलें हसत
तरि बेगम होती जपत

झाली संजीवनि-मात्रा-रोषनार बेगम माता ११

वैभवावरी चढणारा-शौर्यकीर्ति गाजवणारा
अटकेवर बाहु-बलानें-जरिपटका नाचविणारा
बा! अशा महाराष्ट्रा! तूं-यवनी मातेचा प्यारा
तत्स्मरण सदा तुज व्हावें
यवन सर्व बंधू-भावें
त्वां प्रेमानें कवळावे
शिकवून गेली सच्चरिता-रोषनार बेगम माता १२

---

# " कुंभेरीची भंबेरी "

सर्व उत्तर हिंदुस्थान काबीज करण्याच्या इराद्यानें इ० स० १७५४।५५ सालीं श्रीमंत रघुनाथराव पेशवे, यांनीं पुण्यांहून नगारे वाजविले! त्यांच्याबरोबर मल्हारराव होळकर, जयाजी शिंदे, यशवंतराव पवार वगैरे मातबर सरदार होते. हा पेशव्यांचा दिग्विजयी काळ होता. जयपूर, बिकानेर, कोटा या संस्थानांतून खंडण्या घेत घेत मराठी फौज सुरजमल्ल जाटाच्या मुलुखांत शिरली. मराठ्यांनीं त्याजकडे एक कोट रुपये खंडणी मागितली; तो ४० लक्ष रुपये देण्यास कबूल झाला. मराठे ऐकतना. जाट चांगला सामर्थ्यवान् व लढवय्या होता. कुंभेरीच्या अभेद्य किल्ल्यांत त्याचें ठाणें होतें. त्यानें ४० लक्ष रु० घ्या नाहीं तर युद्धास तयार रहा. असा निरोप देऊन बरोबर ५ गोळ्या व दारूही पाठऊन दिली.

मराठ्यांस मनस्वी अपमान वाटून त्यांनीं कुंभेरीस मोर्चे लाविले. मल्हारराव होळकरासारखा युद्धकलापटु सेनापति पुढें होऊन त्यानें खंदकांतून तोफा, हस्तनाला व सुतरनाला यांचा कुंभेरीवर मारा सुरू केला! जाटांनींही वरून आगीचा केवळ पाऊस पाडला! इतक्यांत मल्हार-रावाचा एकुलता एक पुत्र-साति अहिल्येचा सौभाग्यतिलक -खंडेराव जाटाकडील जेजालेच्या गोळ्यानें मोर्चांत ठार झाला. पुत्र दुःखानें भडकून गेलेल्या त्या कर्दनकाल वीरानें यमुनेच्या तीरीं त्याचें श्राद्ध करीत असतां घोर प्रतिज्ञा केली कीं, " कुंभेरीची माती खणून यमुनेत टाकीन तरच जन्मास आल्याचें सार्थक्य! "

सुरजमल्ल जाट मल्हाररावास ओळखून होता. होळकर आपली प्रतिज्ञा पूर्ण केल्याशिवाय राहणार नाहीं ह्मणून त्याला जरब बसली व तो घाबरला. त्याचा रूपराम नांवाचा एक मोठा राजकारणी मंत्री होता त्यानेंही जाटास तह करण्याची सल्ला दिली. जाट अर्ध कोट रुपयांची खंडणी देऊन शरण आला! होळकरांच्या नुसत्या जरबेनें " कुंभेरची भंबेरी " उडाली! शरण आलेल्यावर शस्त्र धरूं नये हें लक्षांत घेऊन त्या उदार सरदारानें त्यास सोडून दिलें.

दाक्षिणात्य शौर्याब्धीच्या-भरतीचा विजयी काळ
केंद्र-स्थल पुण्यपुरीचें-उठल्या लाटा विक्राळ
उत्तर विंध्याद्रीपुढचा-मुलुख तो बिकट खडकाळ
जयपूर बिकानिर कोटा
यांच्या तुडवुनि गढ कोटां
जाटावर वळल्या लाटा
आली वेळा उडणारी-कुंभेरीची भंबेरी १

सरादरांच्या तोफांचे-कोटाला मोर्चे भिडले
सुटती गोळ्यावर गोळे-तटबंदी लेश न हाले
रेतीचें रणमैदान-यत्न ना सुरंगी चाले
चावती मराठे ओठ
सांपडतां थोडी वाट
काढूं कापोनी जाट
उडवूं ह्मणती निर्धारीं-कुंभेरीची भंबेरी २

भाल्याच्या फाळावरती-बसवोनी जयलक्ष्मीला
दुंदुभिच्या ठेक्यावरती-नाचवीत शौर्यश्रीला
ढालेचा मिरवित हात-इंदुरचा गाजी आला
अभिमान सुभेदारीचा
विश्वासहि कर्तृत्वाचा
उचलिला विडा पैजेचा
उडवीन ह्मणे मल्हारी-कुंभेरीची भंबेरी ३

जोडी कर्णार्जुन यांची-किंवा अर्जुन भीष्माची
कीं सुरेंद्र इंद्रजिताची-इंद्रजीत सौमित्राची
वा रावण रघुनाथाची-रघुनाथ परशुरामाची
त्या रणतीर्थाच्या तीरीं
एकाला दुसरा भारी
जन ह्मणती-" निश्चयकारी-
हा उडविल रिपुबलहारी-कुंभेरीची भंबेरी !" ४

निर्भय संगर करणारा-छातीचा बांधुन कोट
कोटाला मारुन बगल-दारावर गेला थेट
'एक कोट' करुनी चढला-फौजेचा घेउन गोट
हस्तनाळ गर्नाळांचा
सुतरनाल जेजालांचा
वर्षाव करुन अग्नीचा
चढवी उडवाया स्वारी-कुंभेरीची भंबेरी ५

घन गर्जे सुरजमल्ल[1]-हरिही मल्हारी[2] गर्जे
हेमंत-भानुसम जाट-हा ग्रीष्म-भानुसम साजे
तो नीळ शनैश्वर-तारा हा मंगळ-तारा शोभे
कुंजर जैसा नंदीला
कीं गरुड जणो हंसाला
तैसा भिडला जाढाला
उडवाया समरविहारी-कुंभेरीची भंवेरी ६

विजयाचें तोरण इकडे-अर्जुन हा बांधित होता
तिकडे सुत खंडेराव-अभिमन्यू झगडत होता
मोर्चांच्या चक्रव्यूहीं-जणु भास्कर तळपत होता
अवतारच खंडोबाचा
उडवी भंडारा रिपुचा
तो कसचा परतायाचा
उडविल्याविना माघारी-कुंभेरीची भंवेरी ७

जाटांची कडवी जात-अन्नूस्तव मरतिल सारे
दांतीं तृण धरातिल कसचे-जीवाला तृण गणणारे
मरतांना पडतिल उलथे-पाठ न परि दाखविणारे
त्यांनाच तयांची जननी
होई धन्य प्रसवोनी
तन्निश्चय गेला ठरुनी
" पाहूं कैशी उडणारी-कुंभेरीची भंवेरी " ८

---

१ कुंभेरीचा किल्लेदार २ मल्हारराव होळकर

कडकडाट इतुका झाला-कीं असंख्य विद्युत्पात
इतुके गोळे सुटले कीं-जणु ताऱ्यांची बरसात
इतुका उठला कीं धूर-जणु घन जमले व्योमांत
पहिला दरवाजा फुटला
दुसऱ्यावर हल्ला चढला
चिरडून तिथें वैऱ्याला
उडविण्यास घेई भरारी-कुंभेरीची भंवेरी ९
अपशकुनी डावा बाहू-तों एकाएकीं स्फुरला
जेजालेच्या गोळ्यानें-' खंडोजी ठार जहाला
एकतांच दुर्वातेला-हातांतुन भाला पडला
शव लावोनी पोटाशीं
गाळी अश्रूंच्या राशी
गमलें परकीय जनांशीं:—
विसरेल वाक्य मल्हारी-' कुंभेरीची भंवेरी ' १०
मारिला फणेवरि टोला-फणि सूड न घेईल काय ?
छाव्याचा मुडदा बघुनी-संतप्त केसरी होय
जल-ओघाखालीं-खळगा पाडितां, गर्जना होय
ज्याचा विजयी भुजदंड
शत्रूंची शमवित कंड
मिळवी जयकीर्ति अखंड
उडवील न काय करारी-कुंभेरीची भंवेरी ११
" त्वां माझें श्राद्ध करावें मज तुझेंच करणें आलें !
तव हस्त-तिलोदक घ्यावें-मी तुलाच घ्याया दिधलें !

सुत एकचि तूं होताशी-मत्सद्गति पुढची न कळे
दिसतो झाला निर्वंश
ज्यानें केला विध्वंस
छेदीन तयाचा वंश
उडवितों पहा अनिवारी-कुंभेरीची भंवेरी १२
ऐक गे! अहिल्ये! देवी!-ठेवी न चितेवर पाय
तूंही विरहाची आग-मज लावुंनको गे हाय!
पितृतुल्य-स्वशुर विनंती-तूं अमान्य करिशिल काय?"
ती स्नुषा शीलकुलवान
परतवी तिला विनवून
येतों वदला उडवून
रिपुवंश हनन करणारी-कुंभेरीची भंवेरी १३
"कुंभेरीचा कुंभार-बसवीन गाढवावरती
चौमुलुख धिंड काढून-नेईन यमाच्या हातीं
यमुनेचा बनविन गाळ-या कुंभेरीची माती
सार्थकता तरि देहाची
पूर्तताहि जनकत्वाची
त्यावीण शांतता कुठची
अजि उडेल संस्मृतिकारी-कुंभेरीची भंवेरी" १४
ऐकुनी प्रतिज्ञा उग्र-वायूही चित्तीं भ्याला
तव भरलीं शंभर वर्षे-सांगत सुटला जाटाला
मोठीच वावटळ उठुनी-गड पांडुरवर्ण जहाला
तरुवर उमळोनी पडले

घन विवर्ण होउन गेले
कीं उडवी आजचि नकळे
हा भीष्म प्रतिज्ञाकारी-कुंभेरीची भंबेरी १५
घेतलें सतीचें वाण-परतेल न तो माघारीं
राहिला उभा बदलून-तो दहांस असतो भारी
तळहातीं शिर जो घेतो-काळाहि त्याला न निवारी
रूपराम मंत्री वृद्ध
राजनीति कुशल गुणज्ञ
स्वामीस करी सद्बोध
उडवील वीर इंदोरी-कुंभेरीची भंबेरी १६
" नांवच[1] ऐकोनी घोडे-लाविती न मुख पाण्याला
थोपटून मानेवरती- पुसतात तुर्क तुरगाला
'क्या पानीमे दिखता है-मल्हारी भालेवाला ?'
ऐसा ज्याचा हो ! धाक
तो करील दौलत खाक
माराल मागुनी हांक
उडतांची हृदय विदारी-कुंभेरीची भंबेरी १७
कोपून पुणें दरबारीं-आपटतां पद जोरानें
तो काबुलचा दरबार-दरकला उग्र भीतीनें !
तें सुलेमान तख्ताचें-हाललें शिखर कंपानें !!
वेळीं न हुषारी धरिली
पगडी न जरी लववीली

1 मल्हारीचें.

तरि सर्वांशीं उडलेली
पाहुन येइल अंधेरी-कुंभेरीची भंबेरी १८
ज्याच्या भाल्यावर निंबू-शेंदुर फांसोनी राही
निंबू कसचे राया! तें-वैऱ्याचें डोकें पाही
काळाचा दंड बघोनी-रक्ताचें पाणी होई
बुद्धीशीं वैर न आणा
हित वच सलतिल जरि कर्णा
तरि उडलेली बघतांना
डोळ्यांतुन वाहिल वारी-कुंभेरीची भंबेरी १९
राजस्थानाची भूमी-हयपदोत्कीर्ण झालेली
आर्यावर्ताची धरणी-वृकगृध्र-काकमय असली
अंतर्वेदीची क्षोणी-नररुधिरसिक्त बनलेली
यांकडे तरी पाहून
शक्ती अपुली जाणून
उडवा न गर्व वाहून
अंतर्यामीं सलणारी-कुंभेरीची भंबेरी २०
खंडणी अर्धकोटीची-देउन रिपु शरणीं आला
चरणीं लवलेल्यावरतीं-धरवे न शस्त्र कोणाला
शूरास दयेचीं शास्त्रें-लागती न पढवायाला
औदार्य मनाचें दावी
रक्तपात चुकवी भावी
नुसत्या जरबेनें उडवी
रिपुगर्व हनन करणारी-कुंभेरीची भंबेरी २१

# बळवंतराव मेहेंदळे.

## विषय—सूत्र.

"गिलच्यांच्या सरदारांनीं रोज रोज आमची रसद लुटावी, पठाणांनीं आमच्या सैनिकांचा धुव्वा उडवावा आणि आमच्या एकाही मराठे सरदारास या गोष्टीचा सूड उगवितां येऊं नये! ही मोठ्या नामुष्कीची गोष्ट आहे! आमचे कांहीं सरदार तर पोरवयाचेच आहेत; पण—" जनकोजी शिंद्यानें भाऊसाहेबांस पुढें बोलूंच दिलें नाहीं; तो ताडकन उठून उभा राहिला आणि ह्मणाला—"कां हा रणसिंह शिंद्यांचा छावा स्वामीस तेजोहीन वाटला कीं काय? हा असा जातों—आणि या म्यानांतून बाहेर काढलेल्या समशेरीचा प्रभाव दाखवून नंतर चरणांचें दर्शन घ्यावयास येतों." असें बोलून तो अठरा वर्षांचा फाकडा वीर भर दरबारांतून निघून गेला! भाऊसाहेब व त्यांचा तो दरबार त्या बालवीराकडे विस्मयपूर्ण' दृष्टीनें पहातच राहिला. !

हा तरूण वीर आपल्या बोलण्यानें इर्षेस चढून साहसास प्रवृत्त झाला हें ध्यानीं येऊन प्रसंगीं मदत करावी व पाठ राखावी ह्मणून बळवंतराव गणपत मेहेंदळें यांस हुकुम सुटला! बळवंतराव व जनकोजी यांचें मनोमनीं चांगलें नव्हतें. मेहेंदळे आपली खास पागा घेऊन गेले. पण शिंद्यांवर ऐन गर्दीच्या वेळीं एकजात ५०० पठाणी स्वार तुटून पडले असतांही ते गिधाडा सारखे घिरट्याच

घालित होते! मेहेंदळ्यांची हरामखोरी शिंद्यांच्या तेव्हांच लक्षांत आली आणि त्या झटक्यांत तर तो अधिकच मर्दुमकीनें लढला.

विजयी होऊन रक्तानें भरलेली ती जनकोजीची बालमूर्ती आपल्या कंगणीदार पगडीला मिरवीत घाम पुसीत दरबारांत ठाकली! तेथें मोठ्या जोरदार भाषेंत त्यानें मेहेंदळे यांचा पाजीपणा व्यक्त केला. भाऊसाहेबांनीं शिंद्यांची पाठ थोपटून बळवंतरावास दोष दिला! गुडघ्यांत मान घालून बसलेले बळवंतराव घरीं येतात तों दारांतच उभ्या असलेल्या त्यांच्या पत्नीनें 'कीर्तीचा ध्वज मळवीला!' असें ह्मणून त्यांचा धिक्कार केला. घरीं दारीं चोहींकडे होत असलेल्या अपमानानें तो मानी पुरुष चिडून गेला. मळविलेला कीर्तिध्वज उजळून येईन नाहीं तर आपली "स्वर्गांत भेट होईल" असें पत्नीला सांगून त्यानें एकदम डंके वाजविले! ते ऐकतांच आपली खास तैनाती फौज घेऊन तो सरदारांचा सरदार सदाशिवराव भाऊ बळवंतरावांच्या रक्षणाकरितां त्यांच्या पाठीसी धांऊन आला! स्वतः श्रीमंत भगवा झेंडा तोलीत आपणाकरितां येत आहेत; हें पाहतांच बळवंतरावांचा कंठ भरून आला! पुढें दोघांनीं गिलच्या बरोबर केलेला संग्राम येथे गद्यांत लिहिण्यापेक्षां तो पुढील पद्यांतच वाचिलेला बरा. त्या युद्धांत बळवंतराव पडले. भाऊसाहेब अत्यंत दुःखानें त्यांचें प्रेत घेऊन परत वळले. पुढें मेहेंदळ्या बरोबर त्यांची सत्यवचनी पतिव्रता स्त्री तिथेंच सती गेली!!

## १ "कीर्तीचा ध्वज मळवीला!"

ह्मणतात काल स्वारींनीं-कीर्तीचा ध्वज मळवीला
आपण जनकोजी शिंदा-बालवीर तोंडीं दिधला
दुरुनीच घालुनी घिरट्या-गृध्रासम डोळा दिधला

मी माहिंदळे वीरांची
वीर पत्नी असतां साची
वार्ता दुर्लौकीकाची
मग कैशी ऐकूं बोला-कीर्तीचा ध्वज मळवीला १

ओठाच्या वरचें दूध-अजुनी न जयाच्या सुकलें
अठरा वर्षांचें पोर-झेंडे फडकावित आलें
रणशूर शिकंदर गाजी-ते माशा उडवीत आले
व्यक्तीद्वेषाचा सुड
देशाच्या कार्यीं मूढ
उगविनात मानारूढ
नुमगलें कसें स्वारीला-कीर्तीचा ध्वज मळवीला २

पांचशें पठाणी स्वार शिंद्यांवर येऊन पडतां
एकटाच " हर ! हर !" शब्दें-बेहोष होऊनी लढतां
तुह्मी भीमासम लढवय्ये-तें कोठें गेलां होतां ?
कांकणें आह्मांसम हातीं
कां भरलेलीं तीं होतीं
दगडासम करुनी छाती
परतोनि कैसें आलां ?-कीर्तीचा ध्वज मळवीला ३

रक्ताच्या कारंजांचे-तनुवरी फवारे बसले
घामाच्या धारा फुटुनी-मुखही डवडवुनी गेलें
त्या अपरंपार श्रमानें-तें म्लान जरासें झालें

ऐशी शिंद्यांची मूर्ती
ठाकतां पेशव्या पुढतीं
" शाबास ! वाहवा ! " ह्मणती
धिक्कार जाहला अपुला-कीर्तीचा ध्वज मळवीला ४
" उलटें काळिज जयांचें-कुलटे आह्मांसह होते
चोरटे दगलबाजीनें-घिरट्या घालित तैं होते
उलटेल केधवा डाव-उलटे चिंतित ते होते "
शिंदे ऐसें रागांत—
वदतां भर दरबारांत—
घातली मान गुडघ्यांत !
निर्लज्ज कसे तैं झालां ?-कीर्तीचा ध्वज मळवीला ५
पाहतांच रणमैदान-रोमांच थरारुनि जावे
आवेश भरोनी अंगीं-छातीचे बंद तुटावे
हृदयाच्या ठोक्यासरसी-शरिरांत रक्त उसळावें
जे प्रळयकाळचे सांब
काळाला ह्मणतिल-' थांब !
पळुं नको असा तूं लांब '
बळी पडेल ते द्वेषाला-कीर्तीचा ध्वज मळवीला ६.
ऐकुनी जयांचें नांव-अरि शरिरीं कंप सुटावा
नौबतिचा ध्वनी दुमदुमतां-धैर्याचा दोर तुटावा
उसळुनी धडाडी घेतां-शेळ्यांचा कळप पळावा
ते काल ऐन समयातें
लावितां न कर खड्गातें

टकमक कां पाहत होते ?
मतिविकार कैसा झाला-कीर्तीचा ध्वज मळवीला ७
करकरीत कोरे कपडे-रक्ताचा डाग न एक
घमघमाट ये गंधाचा-घामाचा थेंब न एक
तरवार कटीला नाहीं-हातांत छडीचा झोंक
या ऐशा वेषें मजला
कां भुलवायाला आलां ?
भुलणारी नाहीं विदुला
शौर्यावर पाडुन घाला-कीर्तीचा ध्वज मळवीला ८
स्वारी विजयाची माला-कंठीं येइल घालून
मी दारांतचि आनंदें-पंचारति ओवाळीन
राहुनी उभी शेजारीं-वरती पंखा वारीन
भोपळा भ्रमाचा फुटला
आशातरु दग्ध जहाला
मी सोडी निश्वासाला
ऐकिलें यदा वार्तेला-कीर्तीचा ध्वज मळवीला ९
दोषितात तुमचे तुह्मा-सरदार तसेचि शिपाई .
गोटां गोटांतुनि ऐका-किति निंदा चाले बाई !
उपमा देतात तुह्माला-" हे बारागिरांचे भाई !"
दुःशब्द कसे ऐकवती
अपमान कसे साहवती
कां वाटत नाहीं खंती
लाविला डाग वंशाला-कीर्तीचा ध्वज मळवीला १०

“ हा बेहिमत्याचा मुलगा ”-वदतील लोक बाळाला
“ ही नामर्दाची दासी ”-हिणवितील बाई मजला
“ विश्वासघातकी, पाजी ”-हीं विशेषणें तुह्माला
तुमच्या वडिलांची कीर्ती
दुमदुमते आर्यावर्ती
होती शौर्याची मूर्ती
मोठ्यांच्या पोटीं आलां-कीर्तीचा ध्वज मळवीला ११

एरंड उसाच्या पोटीं-सेवाळ नदीच्या कांठीं
कीं आम्र फळाच्या पोटीं-निःसत्व असावी बाठी
कंटक पुष्पाच्या देंठीं-कांटे फणसाच्या पाठीं
कीं काच हिऱ्याच्या पोटीं
तुळशींत भांग उफराटी
अंधार रवीच्या पाठीं
तैसें जन्माला आलां-कीर्तीचा ध्वज मळवीला १२

आलांत तसे जा परती-हें तोंड न मज दावावें
घालून पालथे शत्रू-मातींत मिळवुनी द्यावें
पडलेला डाग धुवोनी-दासीला दर्शन द्यावें
जरि गेलां स्वर्गावरतीं
तनु ठेउनि सरणावरती
सेवीन येउनी वरती
जन बोलोत न या बोला-“ कीर्तीचा ध्वज मळवीला ” १३

## २ " स्वर्गांत भेट होईल."

भामिनी पुरें कर आतां-वाणीचें शर-संधान
त्वां जागविला हा सिंह-खुपसून विषारी बाण
दारूच्या कोठारास-लाविला अग्नि हा जाण
हो बाजूला चल दूर
गिलच्यांचा किति मगदूर
जरि दैवाचें झालें क्रूर
तरि शेवटचे हे बोल-'स्वर्गांत भेट होईल' १

स्मरुनी वडिलांचे पाय-वाहतों शफथ कीं साफ
पडला कीर्तीला डाग-तो करीन रुधिरें साफ
देणें पडलें देईन-प्राणाचें भरुनी माप
कां प्रबळ गजाचा छावा
अबलेनें धिःकारावा
हा दुर्दैवाचा कावा
जर शेवटचाच असेल-स्वर्गांत भेट होईल २

ऐसाच जाउनी घेतों-समशेर आणि ती ढाल
बळवंतराव मी नाहीं-जाहलों पुरा वेताळ
एकची करोनी देतों-आकाश आणि पाताळ
रिपुपक्षा कडचीं भूतें
नाचवितों " थै थै " तेथें
आलों तर येइन येथें
अंतिम वा संगमकाल-स्वर्गांत भेट होईल ३

दुसऱ्यांचें साह्य कशाला-वनराज एकटा जातों
गर्जना फोडुनी मोठी-धडकी शत्रूला भरितों
झेंपे सरसी मेंढ्यांचा-फडशा पाडोनी येतों
कोल्ह्यांची गडबड काय
ठेविल न एकाहि पाय
ह्मणतील जिवाला हाय
जरि दुर्दैवाचें उलटेल-स्वर्गांत भेट होईल ४
गर्वी षण्मुख बडबडती-थोपटती बाहू दंड
गणपतीच्या बलवंताचा पाहिला न शुंडा दंड
बघतो मजसह लढती कीं-अजि कोण कोणते षं-
मी जीव तृणासम गणितों
हें नशीब ठोकून जातों
जातांना तुजला वदतों
उलटेल जरी हा खेळ-स्वर्गांत भेट होईल ५
त्या रणदुल्लाखानाला-खेंचून आणितों पुढतीं
खिळखिळीं करोनी हाडें-वाघाला धरितों हातीं
मिरवीत आणितों येथें-बांधोनी हत्ती वरती
त्या कापाकापी मध्यें
येतिल जे पुढती योद्धे
पाडीन तयांचे मुर्दे
आलीच तशी जरि वेळ-स्वर्गांत भेट होईल ६
मी महिंदळे नावांचा-गोंधळांत उडविन खटका
गाठून वजिर काबुलचा-हातानें मारिन झटका

मग बघेन येतो कोण—करण्याला त्याची सुटका
सिंहाच्या दाढेखालीं
एकवेळ जी सांपडली
वांचते कशाची शेळी
जरि निष्फल वच होतील-स्वर्गांत भेट होईल ७

मज मनःपूत निंदाया-ज्यांच्या जिव्हा चुरचुरल्या
धरतील जिभा हातांत-लाविल्या जयांनीं चुगल्या
तोंडांत घालतिल बोटें-ह्मणतील ' कल्पना चुकल्या '
हे काना मागुन आले
शाहणे फारची झाले
उघाडितों तयांचे डोळे
अवतार जरी संपेल—स्वर्गांत भेट होईल ८

अजवरी चकमकी झाल्या-पोरखेळ पोरांचे ते
हैदोस कसा घालावा-शिकवीन आज मी त्यांतें
कितीकांच्या विधवा दुःखें-लावितील कर भाळांतें
आकाशीं जी थरथरली
उतरेल भूवरी बिजली
जर असेल वेळाचि भरली
ज्योतींत ज्योत जाईल—स्वर्गांत भेट होईल ९

कटिवरती नाहीं बाळ-झोंपला काय नुकता तो?
जागवूं नको? झोंपूंदे-एक वेळ पाहुन घेतों!

कमरेस घालुनी विळखा-तो ह्मणेल 'मीही येतों'!
"जरी आलों बाळा! परती
तरि घेईन मांडीवरती
नाहीं तर जेव्हां पुढती
कीर्ति मिळउन येशील-स्वर्गांत भेट होईल" १०

'येतों.'-थोड्यावेळानें-साध्वी! कर्णी वाजेल
तास दोन तासामध्यें-मोठी दंगल माजेल
ही पानपताची भूमी-नररुधीरानें रंगेल
तूं रहा बसोनी येथ
येतों जयघोष करीत
जरि फसले माझे बेत
मग ठरले अपुले बोल-'स्वर्गांत भेट होईल!' ११

तोडुनी पाश मायेचा-कर्मवीर निघुनी गेला
ती तटस्थ पाहत होती-निश्चल हरिणाक्षी विदुला
निज सौभाग्याचा लाल-तो दृष्टिआडही झाला
निश्वास सोडुनी ध्याई
'हे देवी! अंबाबाई!
काळजी इकडची वाही
इच्छा जरि तवचि असेल-'स्वर्गांत भेट होईल' १२

## ३ " विजयाच्या द्वारीं अडला ! "

डंके नौबत रणवाद्यें-हीं कोणाचीं दुमदुमती ?
कोणाचीं निवडक पथकें-वळलीं कुरुभूमीवरतीं ?
हा महिंदळें सरदार-ज्या 'पंचहजारी' ह्मणती !
शिंद्याचें वच ऐकोनी
अपमानानें जळफळुनी
आजि कमरबंद होवोनी
ललकारी ठोकित गेला-विजयाच्या द्वारीं अडला १

श्रीमंत सदाशिव भाऊ-सरदारांचा सरदार
पाठीवर धांवत आला-दासांचा पालनहार
त्या दिलदारा बघुनी-गहिंवरुनी आलें फार
"कीर्तीचा ध्वज मळवीला
स्वामी ऐशा दासाला
कां परतविण्याला आलां ?
परतेल न चाकर अपुला-विजयाच्या द्वारीं अडला " २

" बळवंतराव ! ईर्ष्येनें-एकटे चालुनी आलां
सांभाळा आतां बाजू-लागेल डाग तोंडाला
भिडवितों बगल मी डावी-तुह्मि उजवीला सांभाळा "
तो गरुड भरारी मारी
भुज पक्षानें रिपु सारी
कितिकांना ठोके मारी
कलकलाट भारी केला-विजयाच्या द्वारीं अडला ३

बाणांच्या कैच्यावाले-धाडसी जंबूरेवाले
उडवित आगीच्या ठिणग्या-आंगावर धाउन आले
भिडतां बाहूला बाहू-घाल्यावर पडले घाले
‘ मी मरेन वा मारीन
कीं कटेन वा काटीन
पण कीर्तीला उजळीन
ऐशा निर्धारें लढला-विजयाच्या द्वारीं अडला ४ ’

तो ज्वालामुखिंचा स्फोट-पाषाणहि द्रवुनी जावे
कीं प्रभंजनाचा लोट-उपटोनी वृक्ष पडावे
प्रक्षुब्ध आब्धिची लाट-मासे खळबळुनी जावे
होणारें होवो कांहीं
मागें ना परतुन पाहीं
तुडवीत शवांना जाई
चौफेर घेरला गेला-विजयाच्या द्वारीं अडला ५

भीषण शब्दांचे मेघ-पर्वतावरी घसरावे
मोठाल्या जल ओघांनीं-सागरतीरीं नाचावें
कीं पतंग दीपाभंवती-चहुंबाजूंनीं झडपावे
धिप्पाड काबुली वीर
होउनी लाल अंगार
ठाकले कराया वार
फिरवी पाय न तरि अपुला-विजयाच्या द्वारीं अडला ६

एकटा वीर सगळ्यांशीं-झगडे मोठ्या निर्धारें
ढालेचा फिरवित हात-चुकवी खड्गांचे मारे
आले पट्टे धावोनी-जीवास जीव देणारे
खणखणाट मोठा झाला
रक्ताचा पाउस पडला
तो महिंदळा मरणाला
थोडाहि न चित्तीं भ्याला-विजयाच्या द्वारीं अडला ७

जाळ्यांत वाघ सांपडला-हें दुरून अवलोकोनी
भगवा झेंडा तोलीत-आला 'भाऊ[2]' धावोनी
नेटानें चढवुन हल्ला-घुसला तो फाळि फोडोनी
तो[1] योद्धा[2] हिंमतवान
पाही गर्दन वळवून
प्रेमाश्रू आले भरुन
दुप्पट अवसानें भरला-विजयाच्या द्वारीं अडला ८

मोहरा खुद्द स्वारीचा-जवळी आलेला दिसला
शत्रूसेनेचा डोळा-श्रीमंतांवरती फिरला
नरहरीच तो तर होता-आतड्याच फाडित गेला !!
तो प्रसंग पाहुन नयनीं
चाउनी ओठ दातांनीं
पलटी घेवोनी त्यांनीं
"हर! हर!" ऐसा ध्वनि केला-विजयाच्या द्वारीं अडला ९

---

१ बळवंतराव. २ सदाशिवराव भाऊ.

रबरी चेंडू उसळावा-तैसा उसळे त्वेषांत
स्वामीच्या[2] भंवती फिरवी-गरगर पट्ट्याचे हात
जणु भरली होती वीज-त्या शूरांच्या[3] अंगांत
पळसा सम देहीं नटला
शेला कमरेचा सुटला
अवसर ना बांधायाला
रतला स्वामी सेवेला-विजयाच्या द्वारीं अडला १०

उंच उंच हिमगिरि शिखरें-देखावा पाहत होतीं
त्या अशुद्ध शोणित-सरिता-धों धों खालीं वाहाती
गंगा यमुना चळवळती-भूवरच्या पुण्यज्योती
नवबलाहकांच्या पंक्ति
कोलाहल ऐकुन भीती
गिरिशिखराला दृढ धरिती
ऐसा संग्रामीं लढला-विजयाच्या द्वारीं अडला ११

नामर्दाच्याही अंगीं-स्फुरवील चेतना मोठी
विजयश्री हांसत यावी-माला घालाया कंठीं
कर्तृत्व बघोनी शब्द-आले भाऊंच्या ओष्टीं
" वा ! महिंदळे शाबास !
द्या नीचांना गळफास
कोंडून धरा अधमास "
स्वामीवचनें सरसरला-विजयाच्या द्वारीं अडला १२

---

१ बळवंतराव मेहेंदळे २ भाऊसाहेब ३ मेहेंदळ्याच्या

दैवानें केला घात-घातली झडप कौळानें
खंजीर खुपसला पोटीं-गर्दींत कुणीं पाप्यानें.
भूमीवर उलथुन पडला-त्या प्राणांतिक घावानें
आरोळी एकच उठली
भाऊंच्या कानीं आली
तद्वाणी शोकें वदली
'कर्णासम योद्धा गेला'-विजयाच्या द्वारीं अडला! १३

तुटला स्वामीभक्तीचा-तेजस्वी सुंदर हार
सति सुलोचनेचा झाला-इंद्रजीत युद्धीं ठार
त्या मंदोदरिच्या नेत्रीं-लागेल अश्रुची धार
उलटा नाशिबाचा वारा
वाहतां जिवाचा प्यारा
धरणीवर फेकी शरिरा
तो काय करिल दैवाला-विजयाच्या द्वारीं अडला १४

त प्रेत परत मिळवाया-प्रेतावर प्रेतें पडलीं!
परतले सदाशिव भाऊ-बाण्पाला गाळित खालीं!
ती जखम स्वामिभक्ताची-स्वामीला बाधक झाली!
ह्मणती दैवाचे वादी
'पुढच्या नाशाच्या आधीं
अपशकुन घडोनी बाधी'
हा शकुन तसा भाऊला-विजयाच्या द्वारीं अडला १५

---

# “मुसलमान असलों ह्मणून काय हिंदूशीं बेइमान होऊं?”

पानिपताच्या संग्रामांतील मराठ्यांकडील प्रसिद्ध योद्धा इब्राहिमखान गारदी-ज्यावर भाऊंचा एवढा विश्वास कीं,-शेवटचा विजय मी खानाच्या तोफांवर मिळवीन!-त्याला जातीच्या नांवाखालीं आपल्याकडे वळवून घेण्याकारितां आदल्या दिवशीं रात्रीं अहमदशहा अबदालीनें आपल्या डोक्याची पगडी पाठविली व पगडीभाई होण्यास सांगितलें! त्या स्वामीभक्त शूरानें ती परत करून त्याच्याकडे मूठभर दारू मात्र पाठवून दिली!!

पाठविली पगडी अपुली-करण्याला ‘पगडी भाई’
प्रेमाची भाषा तव जी-भेदाची नीती तीही
निश्चय मम ढळला नाहीं-पण विचार आले कांहीं!
पाजिलें जयानें दूध
त्यावरी करोनी क्रोध
कां विष ओकूं मी आज?
स्वामीस घालुनी फासा-बेइमान होऊं कैसा? १

उदगीरावरचा माझा-तो तोफांचा भडिमार
संगीनीची चतुराई-ती कडाबिनींची फैर
पाहुन जो आनंदानें-‘धन्य! धन्य!’ बोले वीर
‘हाय’ काय त्या वदवाया-

राज्यलोभ तव पुरवाया—
दुर्लौकिक घेऊं वायां ?
जातीच्या मोहासरसा—बेइमान होऊं कैसा ? २

व्यक्तीच्या स्वार्थासाठीं-कां देशाला बुडवावें ?
जातीच्या मोहानें कां-जन्मभूमिला रडवावें ?
नश्वर निज सौख्यासाठीं-कां एकीला फोडावें ?
समयींच परीक्षा होते
शीलाला किंमत येते
चढवी शाश्वत कीर्तीतें
तो समय लाभतां ऐसा—बेइमान होऊं कैसा ? ३

" आकाश फाडुनि खालीं-सैतान उतरुनी आला
"'माझा ' इब्राहिम ' असतां-काढीन भाजुनी त्याला
" बसवोनी तोफेवरती-पाठवीन निज-धामाला "
हा भाऊंचा विश्वास
मजविषयीं असतां, त्यास—
सोडाया लावूं श्वास !
हा नव्हे गारदी पेशा-बेइमान होऊं कैसा ? ४

सजलेली दाढी गाझी-भरलेला पीळ जिथेला
पाहुन हात न जो लावी-रुसलेल्यांच्या दाढीला
ताठ्यानें जाती जाट-जाईना परतविण्याला !
माझ्या संगीनी वरती
दिसते ज्याला जयकीर्ती

त्यावरीच फिरवावी ती
शिवते न कल्पना सहसा-बेइमान होऊं कैसा ? ५
कोणती बगल भिडवावी-कोणता व्यूह फोडावा
आणीबाणीच्या वेळीं-मुनसुबा काय ठरवावा ?
बोलावुन आधीं ज्यानें-खानाचा सल्ला घ्यावा ?
सरदारांचा सरदार
दिलदारांशीं दिलदार
माझ्यावर ज्याचा प्यार
विसरुन त्याच्या सहवासा-बेइमान होऊं कैसा ६
चाळितां धर्मग्रंथाला-स्वामीची मूर्ती दिसते !
स्मरतां खलिपांचीं वचनें-तद्वचमाला आठवते !
बघतां भाऊंचे वैरी-रक्ताला उसळी येते !
बंदुकिच्या नलिकेंतूनी
तोफेच्या तोंडांतूनी
उडती गोळे मैदानी
करिती भाऊंच्या घोषा-बेईमान होऊं कैसा ? ७
जातीचे हिंदु असोत-देशाचे बंधू माझे.
अभिमान तयांना माझा-माझ्यावर त्यांचें ओझें
कर्तव्याच्या धर्माला-जागोनी कीर्ती साजे
आज काय सांगूं वर्म
शिकवीन उद्यां तुज धर्म
स्वामीभक्तीचें कर्म
निरवावें स्वामित्रासा-बेईमान होऊं कैसा ? ८

यमुना उतरोनी दिल्ली-अडवून तुवां ती धरिली
दख्खनच्या वाटेवरची-नाकेबंदीही केली
तळव्याची चढली आग—मस्तकास जाऊनी भिडली!
दाराला लावून पाय
वळवाया बघशी काय?
कां होईन मी निरुपाय?
सोडून दीर्घ निःश्वासा-बेईमान होऊं कैसा? ९

होईल उद्यां उभयांचें-जैं हटा तटाचें युद्ध
हुतुतू घालित बोल दीन दीन होऊन क्रुद्ध
मी कर्तव्याच्या घोषें—हसवीन ज्ञानी वृद्ध
गोलघुमट बांधुन पुढतीं
आरवा देऊन भंवतीं
एकदांच ती सरबत्ती
देईन घालुनी वळसा—बेईमान होऊं कैसा? १०

बरवा माझा हा मजला-शोभतो शिपाई बाणा,
मोत्यांची पगडी तूझी-तुजला परती करतांना,
एकमूठ दारू देतों-हा शूराचा नजराणा!
मुसलमान हिंदूसाठीं
घेती मृत्यूच्या गांठी
हा इतिहासाच्या पाठीं
लिहवीन लेख सुंदरसा—बइमोनें होऊं कैसा? १२

# " गारदी कटोनी मेला ! "

कुरुक्षेत्रावर निदानीच्या संग्राम करावयास मराठी फौज सज्ज होऊन पुढें आली. इब्राहिम खानाचे पडघम ढोल झडूं लागले. त्याच्या पलटणी अघाडीवर चालल्या. नखशिखांत लष्कर पोषाखांत नटलेला जो जंगमबहादूर भाउसाहेबांपुढें शेवटच्या सलामीस आला. आणि अहमद-शहा अब्दालीकडून-आपणास येऊन मिळण्याविषयीं-आलेलीं पत्रें दाखवून ह्मणाला, " साहेब ! मीं इस्लाम धर्माचा आहे पण निमक हराम नाहीं हें आपल्या प्रत्ययास येईल. या युद्धांत जरि मी नामोहरम झालों तरी धन्या-करितां-" गारदी कटोनी मेला " हेच माझ्या कीर्तीचे शब्द जगाच्या कानीं जातील ! भाऊसाहेबांचा त्याच्यावर फार लोभ होता; तीं पत्रें पाहून ते सद्गदित झाले आणि इतकेंच ह्मणाले कीं, " खानसाहेब ! मीही तुह्मांबरोबर कत्तल होऊन जाईन पण मागें हटणार नाहीं! आतां बोलायला वेळ नाहीं. घोडा मैदान समोर आहे. या भाऊचा अभिमान खानसाहेब कसा ठेवितात तो मी आज पाहणार आहे. " इब्राहिमखानानें मान लववून फिरून एकवेळां सलाम केला. घोड्यास टांच मारिली आणि एकदम तोफांना सरवत्तीच दिली !!

जातीचा ' खान ' परंतु-जो भारतभू-सूत होता
जो तिच्याच अंकावरती-दुग्धामृत प्याला होता
यत्प्रवाह नदरुधिराचा-नस नसांत-खेळत होता
जननी-ऋण फेडायाला
स्वामिभाक्ति दावायाला
' भाऊ ' पानपताला
इब्राहिम संगिनवाला-गारदी कटोनी मेला !

तो कवायती फौजेचा-चौफेर बांधुनी गोल
चालला अघाडीवरतीं-वाजवीत पडघम ढोल
भाऊंस सलामी देतां-शेवटचे वदला बोल
"मी धर्माचा इस्लाम।
नाहीं परि निमकहराम!
जरि झालों नामोहरम!
संपादिन या कीर्तीला-गारदी कटोनी मेला" २
"ही वेळ न बोलायाची-कर्तव्यसमय हा खान!
हा समोर आतां आहे- घोडा आणि मैदान
पाहीन ठेविता कैसा-या भाऊचा अभिमान"
चढवुनी मिशीवर हात
बोले तो आवेशांत—
"येतील शब्द कानांत
विजयी झाला वा गेला-गारदी कटोनी मेला" ३
मांडीच्या खालीं घोडा-फुरफुरुनी नाचत होता
टाचेनें उडवित गेला-डोळ्यांनीं बघतां बघतां
तो मेघ वायुवेगाचा-वीजेनें भरला होता
'कड कड' या आवाजानें
दशदिशांस भरिलें ज्यानें
अंतींही तो जोमानें
गगनांत निघोनी गेला-गारदी कटोनी मेला ४
गिलच्यांच्या तोफावरतीं-फेंकतां नेमके गोळे
होऊन तयांच्या ठिकऱ्या-अस्मानीं तुकडे गेले

अफगाणी गोलंदाज–होते कीं नव्हते केले
तें युद्ध तोफखान्याचें
चातुर्य खानखानांचें
उलटले डाव युद्धाचे
गढला तेथुनि ना ढळला–गारदी कटोनी मेला ५

भेसूर गर्जना व्हावी-नाचावी चपला वरती
वृष्टि श्रावण महिन्याची-खंड ना जियेला पडती
खालती रक्तमांसाच्या-चिखलानें भरली माती
तो घटोत्कची अवतार
गारदी रिसालेदार
रक्ताची गाळित धार
गर्दीतचि गारद झाला–गारदी कटोनी मेला ६

तें दैवाचि फिरलें होतें-करणार काय त्या कोणी ?
आकाश फाटलें त्याला-लावावें ठिगळ कुठोनी ?
फुटतां सागर रोधावें-खडकानें किती अडवोनी ?
'विश्वास' सोडुनी गेला
'भाऊ' न दिसे नयनांला
पण स्वामीच्या कार्याला
लढला तेथेंची निजला–गारदी कटोनी मेला ७

होळिच्या होळकरांची-आधींच परतली स्वारी
बिजलीवर होउनि स्वार-फिरली शिंद्यांची स्वारी
रणरंग पाहुनी घेती-एकेक पाय माघारी

29.8.0...

समशेर बहाद्दर पडले
तेजस्वी तारे तुटले
पेंढारी धांवत सुटले
रणसिंह न परि चळवळला—गारदी कटोनी मेला ८

शिंद्यांची दृष्टी गेली-इब्राहिमखानावरती
फेट्याचे पेंच सुटोनी-रुळती मानेच्या भंवतीं
अर्धीच ज़ळाली दाढी-तोंडीं फेंसाची भरती
परि कवाय्यती फौजेसी
दे वरचेवर हुकुमाशीं
भिडवी नेउनि गिलच्यांशीं
नखशिखांत शौर्य भरला—गारदी कटोनी मेला ९

शूराचें शौर्य बघोनी-राहवे न त्या शूराला
"शाबास ! खानसाहेब !" -गहिंवरुनी शिंदा वदला
तो जंग बहादुर मान-लववोनी थोडा हंसला
"पाटील चालला तुह्मी
येऊं न शके परि हा मी
कळवा नानांस सलामी
सांगा कीं:—"नाहीं हटला—गारदी कटोनी मेला" १०

तनख्याच्यासाठीं ज्यानें-अडवून कितीदां धरिलें
हट्टही तुह्मीं लाडानें-ज्याचे सगळे पुरवीले
आपुल्या कृपेची छाया-ज्यावरी सर्वदा डोले

बेईमान नाहीं झाला
जागला खऱ्या निमकाला
घनघोर अशा समयाला
हें कळवा हो! नानाला-गारदी कटोनी मेला ११

रडतील बायका पोरें-जा सांभाळा जा त्यांना
घ्या सलाम शेवटचा हा-मज मारूं द्या गिलच्यांना
शिंद्यांनीं मुख फिरवीलें-लावून पदर डोळ्यांना
चालली लांडगेतोड
आली बाजू बिनतोड
सर्वस्वी झाला मोड
विच्छिन्न होउनी पडला—गारदी कटोनी मेला १२

हिंदूंच्या मानेवरतीं-ठेवोनी अपुली मान
देशाचा अमुचा भाई-निजला इब्राहिमखान
जातीचा पडदा आह्मीं-फेकोनी देऊं मान
निजराष्ट्रहिताच्यासाठीं
व्हाव्या सकलांच्या गांठी
परवा न जिवाची मोठी
हें दावाया सकलांला—गारदी कटोनी मेला १३

# “ विश्वास सोडुनी गेला.”

पानिपतचें रणकंदन जोरांत येऊन जेव्हां खाशा खाशांचे मुडदे पडूं लागले. तेव्हां विश्वासरावांनीं हुजुरातीची पागा घेऊन दुराणीवर घोडे घातले आणि एकदम घाव केला ! तों एकाएकींच छातींत गोळी लागून विश्वासराव ठार झाले ! नानासाहेबांचें निधान हरपलें ! भाऊसाहेबही सरक्षिसळ होऊन स्वतः हत्यार चालवीत होते. “ विश्वास सोडून गेला ” ही वार्ता ऐकतांच त्यांचें अवसान गेलें. त्यांनीं जवळ येऊन ‘ बाळ विश्वास ’ ह्मणून त्याला उराशीं लाविलें ! त्यानें “ काका !– ” एवढेंच ह्मणून भाऊंच्या खांद्यावर जी मान टाकिली ती पुन्हां उचललीच नाहीं ! ! तेव्हांचें भाऊचें दुःख किती वर्णावें ?

रणदेवी कुरुभूमीची-शतवर्ष उपोशित होती
पातला सदाशिव भाऊ-रणकंकण बांधुनि हातीं
पेटलें कुंड युद्धाचें-कित्येक आहुती पडती !

आकाश फाटलें सारें
भाऊंना शिरलें वारें
पाडिले शवांचे भारे

तों दुःखध्वनि हा उठला–‘ विश्वास सोडुनी गेला ! १

तें सळसळणारें रक्त-गोठलें आंतल्या आंत
चेहरा उग्र भानूचा-झांकला दुःखमेघांत
दृढ मिठी तीक्ष्ण खड्गाची–जाहली शिथिल हातांत

शत्रूला कर्दनकाळ
पातला तेथ तत्काळ
लावुनी उराशीं बाळ
शोकानें 'भाऊ' वदला—'विश्वास सोडुनी गेला!' २

बोलुनी मुखानें 'काका'-टाकिली मान ती स्कंधीं
बोलणें राहिलें पुढचें-मृत्यूची चढली धुंदी
अंतींची इच्छा वदण्या-राहिला न थोडा संधी
"घरबुडवे स्वामिद्रोही
गेले मज सोडुनी, कांहीं
चिंता मीं केली नाहीं
पण हाहि लाडका मातें—'विश्वास सोडुनी गेला!' ३

जिंकुनी दोन दिवसांत-दिल्लीला दासी केली
फोडुनी तक्त यवनांचें-उधळोनी शकलें दिधलीं
दक्षिणचा राजा तेथें-बसवीन प्रतिज्ञा केली
आशेचे उंच मनोरे
गगनाला जे भिडणारे
ज्यांवरतीं रचिले सारे
युवराज इथें तो मातें—'विश्वास सोडुनी गेला!' ४

वसईच्या युद्धीं ज्यांनीं-घाबरा 'फिरंगी' केला
दभईला ज्यांनीं पुरता-दाभाड्याला निजवीला
भूषवी सदा उभयां ज्यां-विजयश्री घालुनि माला

ते ‘ अप्पा ’ आणखी ‘ बाजी ’
बैसुनी विमानीं आजी
मर्दुमकी बघती माझी
पण काय करूं हो बाबा!-‘विश्वास सोडुनी गेला!’ ५

तोडूनि आइचें पोर-मी निष्ठुर घेउनि आलों
तो बळी इथें हा दिधला-खाटकी कसाई ठरलों
मिळविलें यश जरी आतां-निंद्य या जगीं मी झालों
वेगांत हाकिली नौका
खडकाचा बसला ठोका
मृत्यु या क्षणीं प्रत्येका
दुःखांत दुःख हें मजला-‘ विश्वास सोडुनी गेला!, ६

पुसतील गोपिकावाहिनी-“ विश्वास कुठें भावोजी
गुणसौंदर्याची ठेव-विसरलां कुठें ती माझी
तनमणी गळ्याचा होता-निजविला कुठें रणगाजी ’
दाबिल्या आंतल्या ज्वाला
तोडिला पोटचा गोळा
स्वाधीन जियेनें केला
मी सांगूं काय तियेला-‘ विश्वास सोडुनी गेला!’ ७

टाकुनी लेखणी ज्यानें-समशेर चढविली हाता
ती टाकुनियां संग्रामीं-येइल कां मजला जातां
दादाला काळें तोंड-दाखवूं तरी कां आतां

मारुनी थडक गिलच्याला
घेऊनी विश्वासाला
फिरविल्याहि असत्या ढाला
पण तोच कलीजा माझा-‘ विश्वास सोडुनी गेला !’ ८

नानांना जाउनि माझें-साष्टांग नमन सांगा हो
भट कुळांतील भट गेला-अश्रु ना कुणाचें वाहो
“ छत्रपती शिवबाचें-तें तक्त सलामत राहो ”
बोलुनी अशा या बोला
तो आगीचा जणुं गोळा
आगींत उडोनी गेला
जाळिती शद्ब हृदयाला-‘ विश्वास सोडुनी गेला !’ ९

# "गिलचा खाशानिशीं मारीन!"

विश्वासराव ठार झाले! हें वर्तमान भाऊसाहेबांनीं पाहून अवसान सोडलें. बहूतसा विलाप करूं लागले. मग भाऊंनीं निश्चय केला कीं, या उपरी 'गिलचा खानानिशी मारीन म्हणोन लोकांस ताकीद केली. आणि झुंज केलें. हाणा! हाणा! असें मुखें बोलोन बरोबर समशेर बहाद्दर घेऊन पुढें झाले. आणि तीन वेळ हत्यार केलें! लोकांनीं हिंमत धरून भाऊसाहेबाबरोबर पुढें सरसाऊन शिपाइगिरी बहुत केली...दुराणी व नजीबखान रोहिला १०।१२ हजार फौजेनिशीं भाऊवर येऊन वर्षले. ते समयीं मारामार अशी झाली कीं, 'न भूतो न भविष्यति' एकंदांच भोंवताले वेष्टून उभे राहिले. आंत खंदळाखंदळ क्षणभर बहुतच केली. त्यांत भाऊसाहेब यांची गत कैशी झाली न कळे. खासे कोणी दृष्टीनें पाहिले नाहींत"

(पाणिपतची बखर)

विश्वासाच्या दुःखाचे-भाऊनें डोळे पुसिले
पिळवटलेल्या हृदयाच्या-उच्छ्वासांना आवरिलें
पाहिलें पुन्हां तें प्रेत-क्रोधानें डोळे चढले
हृदयाचे ठोके पडती
सूडाची भाषा वदती
उठला ऐकुन 'भाऊ' ती
निश्चयांत वदला वाचा—'खाशानिशी मारिन गिलचा' १
सौभाग्यतिलक पार्वतिचा-मळयार्थ 'सदाशिव' सजला!
बलसागर पुण्यपुरीचा-सीमा सोडोनी सरला!
पूज्य प्रभु उदयगिरीचा-मध्यान्हीं तप्त जहाला!

रणवाद्यांच्या नादांत
'हर! हर!' या रणघोषांत
चमके जें खड्ग करांत
त्यावरी लेख शूराचा–' खाशानिशी मारिन गिलचा २
भीष्मास वधाया कैसा-श्रीकृष्ण त्वेषं गेला
निक्षत्रिय महि करण्याला-परशुराम कैसा सजला
भाऊनें गतगोष्टींची-स्मृति दिधली कुरुभूमीला
अंगार भडकली होती
तरि तोफां पुढती छाती
शूराची नाचत होती
वाहे वायू श्वासाचा–' खाशानिशि मारिन गिलचा' ३
प्रत्येक हिराहिरी सरसा-गर्जे कीं "हाणा! हाणा!"
हुतुतूनें लढतां लढतां-खुणवी कीं "हाणा! हाणा!"
' ठेवा मर्दांनो ठेवा-भगव्या झेंड्याचा बाणा '
राष्ट्रीय निशाणावरती
गिलचांची झाली भरती
गर्जेली भाउची मूर्ती
'हा समय क्षत्रधर्माचा-खाशानिशि मारिन गिलचा' ४
उजव्या बाजूनें शिंदा-' हर हर ' गर्जेनी उठला
तीराचा सुटला बाण-कमरग्यांत जाउन भिडला
डाव्या बाजूला खान[१]-गिरिसम होता गढलेला
पुढुनी शिंद्यांचा मार
मागुन खानाचा जोर

१ इब्राहिमखान गारदी.

केला शत्रू बेजार
अभिमान स्वामिवचनाचा-'खाशानिशि मारिन गिलचा'५
हुजुरातीच्या फौजेनें-राखिलें नांव हुजुराचें
वंशदीप यशवंतांनीं-ऋण फेडियलें वंशाचें
दौलतीच्या आधारांनीं-लाविले कौल प्राणांचे
दमदार दमाजी दमला
समशेरबहाद्दर अडला
विठ्ठल शिवदेवहि फिरला
फिरला निर्धार न त्याचा-'खाशानिशी मारिन गिलचा' ६
विजयाच्या उन्मादांत-होता तो अहमदखान
फत्ते झाली ह्मणुनी तो-धुंदींतच दुंदीखान
चावली जीभ नजिबानें-उतरे तो हौद्यांतून
टिपरघाई तरवारीची
क्षणभर केली निंकराची
दिसतां स्वारी शाहाची
कळवि निश्चय भाऊचा—'खाशानिशी मारिन गिलचा' ७
भीमानें शक्ती अपुली-भाउला दिधली होती
विजयानें[1] आनंदानें-चपलता दिलेली होती
जो धर्म युधिष्टिर त्यानें-धीरता अर्पिली होती
पांच नद्या वाहति जेथ
अगणित हा वाहवि तेथ
भिन्नता मात्र वर्णांत
भटमंत्र समरतीर्थाचा-'खाशानिशि मारिन गिलचा' ८

---

१ अर्जुनानें.

नजिबखान अहमदशाहा-अगणित सेनेनिशि आले
" दीन दीन " करुनी त्वेषें-एका भाऊवर पडले
त्यानें ही टाकुन खड्ग-पट्टे हातीं चढवीले !
एकवटुन शक्ती सारी
रोख धरून तो बलहारी
चढवी शाहावर स्वारी
समय सत्यसंकल्पाचा-'खाशानिशि मारिन गिलचा' ९
पुण्यश्री श्रीवर्धनची-राज्यश्री शिवनेरीची
विभवश्री पुण्यपुरीची-धर्मश्री सज्जनगडची
अभिवांछा प्रत्येकीला-भाऊच्या मांगल्याची
शोणभद्र नद तो तिकडे
शोणितनद वाहे इकडे
मांसखंड जिकडे तिकडे
शाहास धाक भाऊचा-'खाशानिशि मारिन गिलचा' १०
भेसूर कृष्णमेघांत-चमकोनी लपला तारा
नाहींच पुन्हा तो दिसला-निखळला कुठें कीं गेला
" भाऊ ! भाऊ ! " ह्मणुनीया-हळहळला भारत सारा
सत्प्रतिज्ञ असती त्यांच्या
जरि सिद्ध न झाल्या वाचा
आहुति देती प्राणांच्या
अर्थ हाच या वाक्याचा-'खाशानिशि मारिन गिलचा ११

# "धन्य जननि जनकोजीची"

कुरुक्षेत्रावर भाऊसाहेबाबरोबर निधड्या छातीनें पराक्रमाची शर्थ करून शेवटपर्यंत लढणारा मराठ्यांपैकीं वीर जनकोजी शिंदे होय. "हाणा ! हाणा !" ह्मणतांना भाऊंच्या तोंडाला खरस आली; गळा कोरडा पडला तेव्हां ते हातानें व माननें "हाणा ! मारा !" ह्मणून खुणवूं लागले ! त्यावेळीं या बालवीरास इतका त्वेष चढला कीं दुराणिचा तोफखाना 'धूं धूं' करित असतां तो दुंदेखान, नजीबखान या रोहिल्यांवर आणि अहमदखान पठाणावर एकटाच अभिमन्यूसारखा तुटून पडला ! धमधम्या पर्यंत घोडदळ नेऊन तोफांच्या कानांत खिळे ठोकले ! त्यानें वरचेवर पडणारे अरबांचे व दुराणीचे वेढे फोडून पुन्हा भाऊसाहेबाजवळ जरि पटका आणून भिडविला ! तेव्हां दोघांवरही दुराणी व नजीबखान हे १० । १२ हजार फौजेनिशीं कोसळले !! तेथें देखील जनकोजीनें 'न भूतो न भविष्यति' असा पराक्रम गाजविला. अनेक घावांनीं घायाळ झालेला हा वीर खंदळाखंदळी करीत मूर्छित झाला. रोहिल्यांनीं त्याला तशा स्थितींत उचलून नेला— पुढें या संग्रामसिंहाचा मृत्यू अत्यंत हृदयद्रावकरीतीनें झाला. रोहिल्यांनीं आपसांतील कलहानें त्याचे तुकडे तुकडे केले व ते जमिनींत पुरून टाकिले !!

## " धन्य जननि जनकोजीची "

आभाळ कोसळुनि पडलें-ज्या दिवशीं भाऊवरती
" हाणा ! हाणा ! " ह्मणतांना कंठाच्या नाड्या फुगती
तोंडाला कोरड पडुनी-शब्द ना उमटनी पुढतीं

---

१ तोफांच्या कानांत

हातानें खुणवी-मारा ?
मानेनें खुणवी मारा ?
शिंद्यांना भरला वारा !
सारिली भिंत फौजेची-धन्य जननि जनकोजीची ! १

बंदुका कडाबिनि यांच्या-फेरीवर फेरी झडती
तोफा जेजाला यांची-सरबत्ती होतच होती
मारुनी मुसंडी त्यांत-मोर्चावर केली गर्दी !
पाणी ओतुन तोफांत
ठोकिले खिळे कानांत'
ठाके रणमैदानांत
घाया धडकी जोराची-धन्य जननी जनकोजीची ! २

चरणारे भीमथडीचे-ते तुरग पंचकल्याणी
कांहीं प्यालेले होते-त्या मुळामुठांचें पाणी
इकडे तर भव्य रिसाला-काबुल खोकंद दुराणी
ते पठाण खैबर घाटी
करिती बहु आटाआटी
दावुनि चपळाई मोठी
भिजवी टोकें भाल्यांचीं-धन्य जननि जनकोजीची ३

वीरांच्या पायां खालीं-घोड्यांच्या टापांखालीं
धरणी गत घायाळांची-उठली भेदक किंकाळी
त्या निर्वाणीच्या कालीं–कोणी न कुणाचा वाली
दिसतील तयां कापावें

येतील तयां झोडावें
यावीण दुजें ना ठावें
तृप्ति करी चामुंडेची—धन्य जननि जनकोजीची ४

वय पुसाल कितिसें होतें—विश्वास तरी तो मोठा
जयवंत 'जयाप्पा' त्याचा—'बापसे सवाई बेटा'!
पेटोनी क्रोधाग्नीनें—वैऱ्यांचा शिजवी घाटा!
कुमक ना कुणाची पाही
कोणी येइल कीं नाहीं
हिमतीनें चालुन जाई
गाळण उडवी गिलच्यांची—धन्य जननि जनकोजीची ५

अश्वत्यामा द्रोणाचा-कीं अभिमन्यू पार्थाचा
कर्णवीर सूर्याचा वा-कार्तीकेय रुद्रेशाचा
मारुती मारुताचा कीं-इंद्रजीत लंकेशाचा
तैसा शूराचा शूर
वैऱ्यांचें दडपित ऊर
हांकून लावितो दूर
सेवा करि निज राष्ट्राची—धन्य जननि जनकोंजीची ६

चढुनी अरबांना जोर-गेले खवळोनी पठाण
धारेखालीं कितीकांना-घडलें कंठाचें स्नान
कापितात कणसें तैशीं-कापिलीं शिरें बेभान
देह्याच्या लाह्या फुटल्या
पगडीच्या कंगण्या सुटल्या

घोड्याच्या दुमच्या तुटल्या
हिंमत चढली फौजेची–धन्य जननि जनकोजी ७
"माझ्या अन्नाचे जे जे असतिल जिवाचे प्यारे
या माझ्या जखमा बघुनी-ज्यांना येतील शहारे
असतिल जरि सेवायाचीं-उघडीं स्वर्गाचीं द्वारें
ते लढोत मजसह धन्य
जावोत पळानी अन्य"
वच वदुनि असें सन्मान्य
गर्जना करी हल्ल्याची!-धन्य जननि जनकोजीची! ८
नेकजात कडवे वीर-भरधाव चालुनी गेले
दाटी झाली चहुंकडुनी-खाशाला खासे भिडले
भगव्या झेंड्याच्या खालीं-योद्धे ढालाइत पडले
बेसुमार कत्तल झाली
भूमी रुधिरानें न्हाली
सिंद्यांची मूर्ति निवाली
काठी घेउन झेंड्याची-धन्य जननि जनकोजीची ९
दाढीके रखनेवाले काबुल कंदाहरवाले
खांडेसे लढनेवाले-जंगसे न हटनेवाले
सूं सूं सणणण् बाणोंकी-बरसात बरसनेवाले
ऐशांचा पडला वेढा
झुंजार वीर तो गाढा
संतोषवि अमित गिधाडां
भागवी तृषा कालीची-धन्य जननि जनकोजीची १०

किल्ल्यांच्या दरवाजाला-मारावी थडक गजानें
पारधी चिरुन टाकावे-जो मत्त वराह तयानें
वृक्षांच्या संमर्दांना-द्यावी टक्कर गेंड्यानें
सरकुनी जरासा मागें
तोंडानें बोलुनि 'घे! घे!
उधळोनी जाई वेगें
कोंडी फोडी वेढ्याची—धन्य जननि जनकोजीची! ११
बंधारा दगड विटांचा-फोडावा जलओघानें
विद्ळाला तट दुर्भेद्य-कीं तोफेच्या गोळ्यानें
भेदावी शैलश्रेणी-देवेंद्र-तीक्ष्ण-वज्रानें
तैसा आवेशें भरुनी
सेनेचे तट पाडोनी
चापल्यें गेला निघुनी
मति गुंग होय शत्रूची-धन्य जननि जनकोजीची! १२
दोन्हीही हातीं पट्टे-चढवोनी 'भाऊ' घुसला
आदित्य प्रळयकाळाचा-दैदिप्यमान तो गमला
कापित उडवित खांडोळी-गेला तो पुरता गेला
दरकेना छाती ज्याची
फिरवी न दिशा पायांची
चमके ठिणगी तेजाची
ऐशा त्या नररत्नाची—धन्य जननि जनकोजीची १३
धूळीचे लोट उठोनी-दिवसाची रजनी झाली!
घनघोर गर्जना चाले-तोफांची चमके बिजली

सर सर रुधिराच्या धारा-वर्षोनी भूमी भिजली
मुंग्यांचें वारुळ फुटलें
तें थांबायाचें कुठलें
उठले ते धावत सुटले
तनु निश्चल धैर्यगिरीची-धन्य जननि जनकोजीची! १४

पाठीवर अरब पठाण-पेंढारी पुढती पळती
दाढी शेंडीची गांठ-तोडुन तुटणारी नव्हती
पुण्याइच ज्या साध्वींची-तत्पाति कहरांतुन सुटती
"पाणी! पाणी!" मागून
कोरड कंठाला पडुन
कितिकांचे सुटले प्राण
बाजू न सोडि शर्तीची-धन्य जननि जनकोजीची १५.

राष्ट्राचा शामीयाना-चौफेर तणावे तुटले
धीराचा एकच खांब-वायूसह झगडुनि डोले
हाँ! पडेल, किंवा पडला-बसती मोठाले झोले!
एका खड्गाग्रावरती
दख्खनची अब्रू होती
तें खड्ग जयाच्या हातीं
त्या शिंदे कुलदीपाची-धन्य जननि जनकोजीची! १६

बद्रिनाथ नारायण जो-लाविले तयानें डोळे
काशी विश्वेश्वर शंभू-तोही न जागचा हाले
वनदेवी अष्ट दिक्पाल-नाहीं कोणीही द्रवले

सांगा नाशिबाला काय
करितां येईल उपाय ?
वदतां न मुखानें हाय !
पूर्ति करी कर्तव्याची—धन्य जननि जनकोजीची १७

वीत वीत जागेवरती-जखमा झाल्या देहाला
जीवाचा होता कोण-तैं पट्ट्या बांधायाला
होवोनी शक्तीपात-झांपड पडली डोळ्यांना
खानानें धरितां हात
मारी झटका जोरांत
नरडीला देउन हात
शय्या केली धरणीची-धन्य जननि जनकोजीची १८

मृत्यूच्या दरबाराचा-शेवटाचा साक्षीदार
मातृ भूमिसाठीं सोडी-नैराश्याचा हुंकार
डोळ्यांतुनि खळ खळ वाहे-ती उष्णांश्रूची धार
दिनमाणि पाठीला झुकला
संमुख परक्यांना झाला
शेवटचा धीरा पडला
सोडी न मूठ खड्गाची-धन्य जननि जनकोजीची ! १९

तो ग्वालेरीचा वाघ ग्लानीनें मूर्छित झाला
रोहिले शिकारी आले-गोटांत उचलुनी नेला
नीचांनीं गृहकलहानें-तो पंचीप्यारा चिरिला

हर! हर! केले हो तुकडे!
हृदयाचे होती तुकडे
पण वदते ऐका तिकडे
रणदेवी पानपताची-धन्य जननि जनकोजीची! २०

फत्तर हिमशैलेंद्राचे-कारुण्यानें पाझरले
दुःखानें धवलगिरीचें-मुख धूसर होउन गेलें
गौरीशंकर नयनाचे-हिमबाष्प राशिवर घळले
पावन पुरुषांची आई
जान्हवी प्रपातें गाई
जीं स्मृतिचित्रें उत्साही
त्यांतुनी नाद ये हाची-"धन्य जननि जनकोजीची"२१

# "भाऊ! भाऊ!"

"नानासाहेब! आह्मां सारखे तुह्मांस पुत्र आहेत व आणखीही होतील. परंतु भाऊ सारखा बंधु मिळणार नाहीं" असें विश्वासरावांनीं पानिपताहून-भाऊसाहेबांस कळूं न देतां-पुण्यास पत्र लिहिलें होतें. त्याप्रमाणें नानासाहेब स्वतः ५० हजार फौज घेऊन त्यांच्या मदतीस निघाले. पण अर्ध्या वाटेंतच त्यास भाऊसाहेब व विश्वासराव पडून मराठ्यांचा विध्वंस झाल्याचें वर्तमान कळलें. त्यावेळीं भाऊच्या दुःखाचा त्यांस एवढा धक्का बसला कीं शेवटीं त्यांनीं पर्वतीवर "भाऊ! भाऊ! ह्मणून प्राण सोडिला !!

बोलता काय हे शब्द-'भाऊ मज सोडुनि गेला!'
ही वार्ता कसली? कर्णी-ओतिलें तप्त तैलाला!
तळमळती पंचप्राण-देहाचा भडका झाला!
शत्रुला न साहे मारा
ज्यापुढें न धरवे थारा
पळती ते सैरावैरा
ऐसा तुटला मम बाहू-भाऊ तुज कोठें पाहूं?
करवीरीं रुसुनी जातां-धावलों तुझ्यामागून
प्रेमाची घालुनि आण-आणिलें तुला परतून
इच्छा पुरवाया सजलों-हें राजपदाहि सोडून
अत्यंत दिव्य ती प्रीति
तुजवरती माझी होती

रुसलास पुन्हां मजवरती
आतां पण कोठें जाऊं-भाऊ तुज कोठें पाहूं २
गेला होता विश्वास-तूं येतासी परतून
तें विष मीं गिळिलें असतें-माधवाकडे पाहून
ती जखम पुत्रदुःखाची-भरली असती मागून
घावावरि बसला घाव
हृदयाचा घेई ठाव
आतां न सुखाचें नांव
'भाऊ' कोणाला बाहूं-भाऊ तुज कोठें पाहूं ३
अवतार परशुरामाचा-अद्वितीय ब्राह्मणवीर
कर्णासम संकटकाळीं-जो स्वावलंबनीं धीर
जो युधिष्ठिराचि भासावा-घनघोर संगरीं स्थीर
ऐसा तूं भाऊराया !
दैवाची वळतां छाया
त्वत्सद्गुण गेले वाया
विरहातें कैसा साहूं-भाऊ तुज कोठें पाहूं ४
कां इतुका देहावरती-तूं उदार झाला होता ?
कां पुण्यपुरीला तूतें-मायेचा कोणी नव्हता ?
प्रीतिचा उन्हाळा राया-तुजला कां झाला होता ?
ममछत्र तुझ्यावरि होतें
तुज कमी काय जगिं होतें
मज कळवायाचें होतें
नसताच दिला मी जाऊं-भाऊ तुज कोठें पाहूं ५

जरिपटकेवाले योद्धे-अटकेला जाउनि भिडले!
फटके बसतां शत्रूचे-पटकेहि गमाउनि आले!
फुटकें हें दैवाचि माझें-चटके हृदयाला बसले
उधळिला सिंह कोल्ह्यांनीं
काढिला पाय व्याघ्रांनीं
घेतला धाक शेळ्यांनीं
कुठवर शोकाला गाऊं? भाऊ तुज कोठें पाहूं ६
उचलुनी तळी शत्रूची-'एळकोट करुनी द्यावा
ऐसा जबरा लढवय्या-कां हात हालवित यावा
मग बरा ह्मणावा ' खान '-प्राणानें केली सेवा
पाहिजे तिथें जातीचें
ना काम मेंढपाळाचें
खाउनी अन्न स्वामीचें
आले हे नांव गमाऊं-भाऊ तुज कोठें पाहूं ७
घोरांत शत्रु पाडावा-ते स्वतांच घोरत पडले!
मारावा मर्मीं डंख-ते डंखी होऊन आले!
चारावी रिपुला धूळ-ते धुळींत लोळत पडले!
ग्रासितां राहु चंद्राला
मुकती तारे तेजाला
सुटका त्याची करण्याला
कां प्राणदान हें देऊं-भाऊ तुज कोठें पाहूं ८
जातीचे पुरुष असोनी-बायका होउनी आले!
ज्या खऱ्या बायका त्यांच्या-अब्रूवर पडले घाले!

आईबापाविण मुलगे-कित्येक पोरके झाले!
आप्ताच्यां भेटी कुटल्या?
प्रीतीच्या माळा तुटल्या
दोन लाख विधवा रडल्या
कां प्राशोनी विष घेऊं-भाऊ तुझ कोठें पाहूं ९

आगींत उडी घेतांना-त्या तुमुल युद्धसमयातें
पळपुटे अशांच्या हातें-त्वां निरोप दिधला मातें
'स्वर्गांत पोंचलों आह्मी-पावावें ना दुःखातें!'
मी वडील असतां मातें
सोडोनी जगतीं येथें
तुज उचिताचि जाणें नव्हतें
कां स्वर्गी उडुनी येऊं-भाऊ तुज कोठें पाहूं १०

अप्पांच्या जवळी बंधो! स्वर्गी गेला असशील
बाजीही विश्वासाला-घेउन बसले असतील
तुज पाहतांच दोघांनीं-मज दोष दिले असतील
संसार न झाला ज्याचा
बळि दिला अशा भावाचा
उरला वंश न काकांचा
हें शल्य कसें तरि साहूं-भाऊ तुज कोठें पाहूं ११

तूं दरबारीं दिसशील-ह्मणुनी मी तेथें जातां
दरबार ढाळितो अश्रू-मी "भाऊ! भाऊ!" वदतां
परतुनी शयनमंदीरीं डोकावुनि तुजला बघतां

स्वकरीं ठेवोनि कपोला
अश्रूंच्या वाही माला
त्या तुझ्या धर्मपत्नीला
कोणत्या वचें समजावूं-भाऊ तुज कोठें पाहूं १२
जे सुभेदार सरदार-विसरले तुला साचार
अंगचोर विधिच्या नांवें-फोडिती खडे ते फार
'मीही विसरावें तुजला-सांगतात गोष्टी चार
जे मोठे मोठे राव
दावितात स्वामीभाव
त्यानींच बुडविलें नांव
हे सारे भोजनभाऊ-भाऊ तुज कोठें पाहूं १३
दुःखद हृदयाचे पीळ-उकलून कुणा दावावे
जें कसेंसेंच मज होतें-तें कसें मुखीं बोलावें
बंधुप्रीतीचें वेड-वेड्यांना कसलें ठावें!
सौमित्रासाठीं हाय!
श्रीराम रडे असहाय
माकडांस त्याचें काय
बोलून कशाला दावूं-भाऊ तुज कोठें पाहूं १४
तव वसतिक्रीडास्थानें-दुःखातें करिती जागें
हा शनवाराचा वाडा-खायास धांवतो मागें
ही धुरा राजशकटाची-ओढाया मन ना लागे
एकान्तस्थल पाहून
पर्वतीवरी येऊन

बसलों तरि विरहक्षीण
जाईना क्लेशद आयु–भाऊ तुज कोठें पाहूं १५
उपवासी भाऊ गेला-गिळवे न अन्न हें उचला
तो निजला भूमीवरतीं-भूमीवरतीं मज घाला
तो गेला वाऱ्यावरतीं–वाऱ्यावर मजही घाला
उघडा तेजाचा लाल
गेला घेवोनी काळ
मज हवी कशाला शाल !
पडला काळाचा बाहू–भाऊ तुज कोठें पाहूं १६
बसलां कां शयनाभंवतीं ?-खालीं घालोनी माना
आणिले कशाला वैद्य ?-जाऊन भाउला आणा !
आला का माझा 'भाऊ' ?–अंधारी आली नयना !
एक वेळ भाऊ बोल !
बोल हा चालला खोल !
करूं नको मदाशा फोल !
ये आलिंगन बा ! देऊं–भाऊ तुज कोठें पाहूं १७
"भाऊ ! भाऊ !" करितांना-गेला देहांतुनि श्वास
जीवास लागला ध्यास-पण पुरली नाहीं आस
दुःखावर बसला डाग–हळहळला सारा देश
इतिहास महाराष्ट्राचा
उज्वल बंधुप्रीतीचा
अजुनीहि पर्वतविरचा
वाहे या शब्दें वायू–भाऊ तुज कोठें पाहूं १८

# "वडगांवावरचा वीर"

( महादजी शिंदे )

पेशवाई मिळविण्याकरितां शेवटीं राघोबादादा-सारख्या भारतीय महावीरानें मुंबईकर इंग्रजांचा आश्रय केला! राघोबास बरोबर घेऊन 'जनरल स्टूअर्ट' व 'कर्नल के' हे दोन रणझुंजार आणि हिय्येबाज इंग्रज सेनापति पुण्याच्या रोखानें निघाले. दोहोंत स्टूअर्ट फाकडा हा फारच पटाईत होता. त्यानें तीनच दिवसांत खंडाळ्याच्या टेकडीवर आपलें निशाण लाविलें! कर्नल के हा पनवेलीच्या मार्गानें तोफखाना घेऊन मोठाल्या मजला मारून स्टूअर्ट यास येऊन मिळाला!

पुणें दरबारास ही वेळ मोठ्या आणिबाणीची होती. इंग्रजांचा पक्ष विजयी झाल्यास पेशवाई त्यांच्या पंजांत सांपडणारी होती. अशावेळीं पुणें दरबाराचे सेनापति देखील किती दक्ष व रणोत्सुक असले पाहिजेत हें कांहीं सांगायला नको. हरिपंत फडके, बर्वे, होळकर वगैरे नामांकित सर-दारांनी तळेगांवापासून बोरघाटापर्यंत मार्‍याच्या सर्व जागा रोखून ठेविल्या होत्या. भिवराव पानशांचा विजयी तोफखाना बीनीवर होता. आणि सर्व सैन्याचें आधिपत्य ज्या वीरभूषणाकडे देण्यांत आलें होतें त्या महादजी शिंद्यांनीं तर प्रतिपक्षास पराजित करण्याची प्रतिज्ञाच केली होती!

युद्धास तोंड लागून पानशांच्या तोफखान्याचा वर्षाव, फडक्यांनीं इंग्रजी पलटणीस मारिलेली धडकी आणि बरव्यांच्या पराक्रमाची शर्थ यांनीं इंग्रजांची दाणा-दाण उडत असतां स्टूअर्ट यासही इतका रणावेश चढला

कीं त्यानें जिवाची तमा न धरितां गर्दीत घुसून बेलाशक हैदोसच केला ! त्याच्या शौर्यानें आनंदित झालेल्या मराठ्यांनीं 'फाकडा' यापदवीनें त्याचा गौरव केला ! शिंदे तर लालीलाल होऊन बेफाम लढत होते. या लढाईंत स्टूअर्ट व कर्नल के हे दोन्ही सेनापति गारद झाले. मराठ्यांच्या चतुर सेनापतींनें वळसे घालून शह लावून इंग्रजी फौज वडगांवावर कोंडली आणि तिला शरण यावयास भाग पाडिलें !

'राघोबा' अंतीं झाला-केवळ कलहाची ज्वाला
मुंबइहुन घेउन त्याला-स्टूअर्ट फाकडा आला
बोरघाट घालुनि मागें-खंडाळ्यावरती चढला
'कां अमुच्या गृहकलहांत
हा रिपु घालितसे हात?'
चावून खालचा ओठ
ये महादजी रणधीर-वडगांवावरचा वीर १
"खंडाळ्यावर खांडोळी-शत्रूची उडवायाची !
शिंद्यांच्या कुलकीर्तीची-आजि नौबत झडवायाची !
विजयलक्ष्मि बाहूवरती-बसवोनी आणायाची"
घेउनी प्रतिज्ञा शिंदा
युद्धीं लढणाऱ्या खंदा
देशाचा चाकर बंदा
उपसून निघे समशेर-वडगांवावरचा वीर २
तळ दिला तळेगांवाला-रोंखिलें बोरघाटाला
निवडोनी एकेकाला-साबित जंग सरदाराला

मा-याच्या जागीं ठेवी-कोंडाया रिपु-सिंहाला
बीनीच्या सरदारांचा
भिवराव पानसे यांचा
ताफा चमके तोफांचा
ठाकला तिथें झुंजार-वडगांवावरचा वीर ३
श्रीमंत पेशवे त्यांच्या-गादीच्या पुण्याईची–
बुद्धीचे सागर नाना-त्यांच्या समयज्ञपणाची–
जे समर धुरंधर शिंदे-त्यांच्या भुजसामर्थ्याची–
ती खरी परिक्षा वेळ
शूरांचा जमला मेळ
झाला एकच कल्लोळ
चमके बिजलीची कोर–वडगांवावरचा वीर ४
होत्या सातच त्या तोफा-चतुर मात्र गोलंदाज
एकेका गोळ्या सरसी-निरवी शत्रूचा माज
संग्रामीं जयमरणाची-रिपुनींहि लाविली पैज
उडवित घोड्याची नाल
वाढवीत पुढची चाल
कापीत शत्रुचा नाळ
घेरा घाली चौफेर–वडगांवावरचा वीर ५
निर्झर वारी–धर अचल-कीं मदधारा–धर दंती
किंवा जैसा शोभावा-उत्फुल्ल पलाश वसंतीं
कीं पयोद वर्षाकारी-कीं जास्वंदीची पंक्ती
ऐसा रुधिरें भिजलेला

घेउन भगव्या झेंड्याला
हैदोस कराया सजला
सोडिना जय-निर्धार—वडगांवावरचा वीर ६

दंगल करण्याला आला-संगीन खोउनी वैरी
आगीचा होउन मारा-फैरीवर झडल्या फैरी
रक्तानें ओलीं झालीं-भाल्यांचीं टोकें सारीं
हुकुमा सरसी वेगानें
वडगांवाच्या रोखानें
वळवी रिपु जैं निजसैन्यें
देई गैबीचा मार—वडगांवावरचा वीर ७

कितिकांचे तुटले हात-कितिकांचे तुटले पाय
किति शिरें तनूविण पडलीं-किति शिरोविहीनहि काय
किति याचिति जल घायाळ-पडल्या जागीं निरुपाय
शूराला लागे चुरस
तोंडाला आली खरस
उत्तेजित करि सैन्यास
घेईना परि माघार-वडगांवावरचा वीर ८

जयवंत 'जयाप्पा' शिंदे-नागोरावरचा वीर
यमुनेच्या घाटावरचा-'दत्ताजी' शिंदे शूर
योद्धा कुरुभूमीवरचा-'जनकोजी' संगरधीर
त्या दिवशीं आकाशांत
सुरवर यांच्या समवेत

डोलत होते मोदांत
वंशज विजयी ठरणार-वडगांवावरचा वीर ९
आकाशांतोनी पडती-त्यावर पुष्पाच्यामाला
कडनिकडीच्या समयाला-चपल हस्त गुंते त्यांला
जणु दे लतिकांजवळी तो-त्या माला ठेवायाला
अमर-लोक आकाशांत
शार्दूल गुहाद्वारांत
विस्मित होते पाहात
नरसिंहाचा अवतार-वडगांवावरचा वीर १०
फडक्यांनीं धडकी सरसी फोडिली फळी शत्रूची
बरव्यांनीं बरवी धरिली-दोन्ही बाजूंनीं कैची
पानसे सारखा वर्षे-बरसात तोफ खान्याची
'स्टूअर्ट' जाहला ठार
'कर्नल के' निजला वीर
सुटला सेनेचा धीर
तैं करी गर्जना थोर-वडगांवावरचा वीर ११
पांढरा बावटा बोले-"थांबवा कत्तल बाजीला"!
उचलोनी टोपी हातें-करि सलाम टोपीवाला!
खङ्गें घेई नमनाला-ग्वालेरी पगडीवाला!!
इतिहास स्वकरीं घेतां
वडगांवाला पाहातां
हा रिपुमित्रांच्या चित्ता
देतो स्मृति वारंवार-वडगांवावरचा वीर

# " एक काळ ऐसा होता "

(१) जुना भारतकाळ (२) श्री छत्रपतींच्या वेळचा मराठी काळ (३) पेशवाईचा काळ (४) पेशवाई बुडाल्यापासून तों श्री. विष्णुशास्त्र्यांपर्यंतचा काळ असे हे काळाचे निरनिराळे ४ भाग आहेत.

## भाग १ ला

जग निद्रित होतें जेव्हां-वेदांत घोष करणारे
जग अज्ञानावस्थेंत-शास्त्रें तेव्हां रचणारे
जग उघडें होतें जेव्हां-तैं उन्नतिला भिडणारे
ज्ञानवंत जन मतिमंत
धन विद्येनें श्रीमंत
होते येथेंच अनंत
रोमांच येति आठवतां—एक काळ ऐसा होता १

एक वेळ गेले शद्व-काय ते पुन्हां फिरवावे
येवो प्राणांतिक काळ-सत्य ते करुन दावावे
भीतीचें नांव कशाला-स्वत्वातें प्रगट करावें
सत्वाचा उज्वल दीप
सत्याचें निर्मळ रूप
आर्यांची कीर्ती अमूप
येई ज्याकाळीं बघतां—एक काळ ऐसा होता २

पाहिजे शूर कां तुह्मां ?-वाचा अर्जुन चरिताला !

कां हवा तापसी सांगा ?-पाहा विश्वामित्राला !
निग्रही पाहिजे कां हो ?-अवलोका जा भीष्माला !
एकेक अलौकिक मूर्ति
कारि कर्तव्याची पूर्ति
मिळवी शाश्वत जी कीर्ति
त्या नर रत्नांचा दाता-एक काळ ऐसा होता ३
पाठीस घातला ज्याला-रक्षक होतील तयाचे
कुणि आश्रित होऊन आला-तर तरुवर हे छायेचे
कुणि चातक होऊनि आला-तर पयोद हे मायेचे
चंदन घासून तनूचें
परक्यांना सुखवायाचें
श्रेष्ठत्व भारतीयांचें
जन वर्णिति येतां जातां-एक काळ ऐसा होता ४
पर धर्माचे ना द्वेष्टे-निज धर्माचे अभिमानी
ना गुलाम करितिल कोणां,-राखतील अपुलें पाणी
अपहार न ठावा ज्यांना-व्यवहार नीतिचे ज्ञानी
भाववंत श्रद्धावंत
स्वातंत्र्याचेही भक्त
ऐहिक विभवास विरक्त
प्रसवी जो आर्य श्रेष्ठां एक काळ ऐसा होता ५
" सोन्याचा कोठें धूर ?-तर भारत खंडामध्यें
कोठें रत्नांच्या खाणीं ?-तर हिंदुस्थानामध्यें
अमृताची वृष्टि कोठें?-तर आर्यावर्तामध्यें "

हें यश परक्यांनीं गावें
मन अगदीं मोहुन जावें
तारूवर भटकत यावें
पाहायातें सुंदरता—एक काळ ऐसा होता ६

---

## "एक काळ ऐसा होता."

### भा. २ रा.

बिनतारांचे संदेश-सोडावे रायगडानें
त्यावरुनी इतर गडांनीं-गुंजावें अति जोमानें
गोळ्यांच्या पर्जन्यानें-भिजवावीं रणमैदानें
शौर्याचा पाहुनि थाट
तोंडांत घालुनी बोट
फिरवावी रिपुनें पाठ
व्हावी भुइ थोडी पळतां—एक काळ ऐसा होता १
गिरि-कुहरांतुनि उफळोनी-वनराज केसरी यावा
कीं ज्वालामुखि भडकोनी-आगीचा लोळ उठावा
कडकडुनी जलधरमाला—वीजेचा गोल तुटावा
शिवबाची स्वारी उठली
भ्रुकुटी कोणावर चढली ?
घटिका कोणाची भरली ?
ऐसी चाले जन-वार्ता—एक काळ ऐसा होता २

भूपाल महाराष्ट्राचा-दरबारीं जेव्हां यावा
"श्री छत्रपती शिवराज"-जयघोष असा उसळावा
सरदार शिलेदारांचा-संघात उभा ठाकावा
गोऱ्याचा टोपीवाला
दिल्लीचा दाढीवाला
मान्य जो तयांसहि झाला
लववितात अपुल्या माथां-एक काळ ऐसा होता ३
जे औरंगाबादेचा-बेरंग करोनी फिरती
दाभोळावर वेगानें-टोळासम जाउन पडती
सुरतेच्या सुरतीवरती-जे हात फिरउनी येती
गो-विप्रांचे ते वाली
विजयाचा तिलक कपाळीं
लावोनी ज्या त्या वेळीं
झटले निजदेशा करितां-एक काळ ऐसा होता ४
वेढिला पुरंदर किल्ला-गाजी दिल्लिरखानानें
कोंडाणा कोंडुन धरिला 'जयसिंह' समर धीरानें
किल्ल्याचे तट लढताती-मोठ्या आणीबाणीनें
जरि शिरें तुटोनी पडती
शिवरायाची आज्ञा ती
तरि कबंध पाळित असती
स्पृहणीय राजभक्तीचा-एक काळ ऐसा होता ५
जन्मभूमि साठीं सांगा-जातिल मृत्यूच्या द्वारीं
कुलकीर्ती साठीं सांगा-काळाचे होतिल वैरी

देशबंधुसाठीं सांगा-शेषावर करितिल स्वारी
समशेरी नाचविणारे
भाल्याला खेळविणारे
चापाला भूषविणारे
या शूरांचा जो दाता-एक काळ ऐसा होता ६
जमवून मांड घोड्याला-भरधाव कसा फेंकावा
जातां जातां खड्गानें-रिपु-कंठ कसा छेदावा
नाचवीत भाला हातीं-कैसा शत्रू वेधावा
हें शिक्षण नव तरुणांचें
'देशभक्त' या पदवीचें
ना. बी. ए. एल्ल् बीचें
उपयोग काय पण आतां-एक काळ ऐसा होता ७
शिवरायासाठीं अपुलें-सौभाग्यहि मळवायाला
एकुलता एकच पुत्र-तोही पण गमवायाला
तत्पर व्हाव्यात सुखानें-धन्य! धन्य! साध्वी विदुला
अपुलें फुटलेंहि कपाळ
राहो सुखि शिव भूपाल
येवो देशास सुकाल
इच्छा विदुलांच्या चित्ता-एक काळ ऐसा होता ८
जैं महाराष्ट्र भूमीची-होती भाग्याची सृष्टि
कोणाची जननी व्याली-टाकेल वांकडी दृष्टि
कोणाची छाती होती-बोलेल वांकड्या गोष्टी
रावा पासोनी रंका

नव्हती कोणाला शंका
शिवबाचा एकच डंका
चहुंदिशेस वाजत होता—एक काळ ऐसा होता १०
घेवोनी उत्कंठेनें-वाचावा गत इतिहास
भिजवावीं त्याचीं पानें-सोडावा दीर्घोच्छ्वास
नयनीं किल्ले पाहोनी—व्हावें चित्तांत उदास
आठवून त्या त्या गोष्टी
लक्षून आजची सृष्टी
अंतरांत व्हावें कष्टी
येती वच सहजीं वदतां—एक काळ ऐसा होता ११

---

## " एक काळ ऐसा होता "

### भाग ३ रा

राघोबा कोठें आहे ?-अहमदाबाद वेशीला
कोणी ह्मणती छे! भिडला-अजमीराच्या कोटाला!
इतुक्यांत बातमी आली-थडके तो मुलतानाला !!
जो अधिपति लाहोराचा—
पोषाख चढवि युद्धाचा
सेनापति पुण्यपुरीचा—
थडके लाहोरा पुढता!!!—एक काळ ऐसा होता १
कृष्णा—कांठाचे घोडे-अटकेला पाणी प्याले
सह्याद्रीचे रणशूर-ते हिमालयाला भिडले
हस्तिनापुराची लक्ष्मी·ढालेवर घेउन आले

त्यांना तें अडवायाची
छाती नव्हती एकाची
घटिका वैभव काळाची
येतात अश्रु आठवितां—एक काळ ऐसा होता २
म्हैसुरचा वाघ निघाला-सावनूर काबिज केलें !
मारवाडच्या रोंखानें-पंजाचे डावाचि खेळे ! !
खेळ खेळ बेटा ! खेळ-पाहा पण उघडुनि डोळे !
युद्धाचे तालीमवाले
पटवर्धन चालुन आले
पाहातांच सावज लोळे
स्फुरते तनु ज्यातें स्मरतां—एक काळ ऐसा होता ३-
हैदराबादचे वीर-पाणी राखाया झटती
भाऊच्या समशेरीचें-पाणी चाखोनी पळती !
राहील कोठचें पाणी !-पाण्यानें तोंडें सुकती ! !
हत्तींच्या सोंडावरती
घोड्यांच्या तोंडावरती
जय चिन्हे शोभा देती
शौर्य-श्री-वर्धनकर्ता- एक काळ ऐसा होता ४
एका निजराष्ट्रासाठीं-विप्र, क्षत्रिय तैसे वैश्य
जातिभेद विसरुन अपुला-व्हावे एकत्र समस्त
एकीचें कळलें होतें-सकला चित्तीं स्वारस्य
त्या देशोन्नतिच्या कालीं
स्वातंत्र्य-निशाणा खालीं

देशभक्त वेळोवेळीं
यावेत सोडूनी स्वार्था-एक काळ ऐसा होता ५
गारदी फौज खानाची-संगीन खोंवुनी चाले
ग्वालेरीच्या पागेचे-सरदार तोलती भाले
माळवी रिसाले भव्य-हेवा-रव करिते झाले
पांढऱ्या गजावर बसुनी
पेशवे निघाले सजुनी
इंद्राची स्वारी ह्मणुनी
भास हाच व्हावा चित्ता-एक काळ ऐसा होता ६
गड दुर्ग न ऐसा उरला-बोंचला न ज्याला भाला
ऐसा न कोणता प्रांत-जो पुण्यपुरीस न भजला
भूपती न ऐसा कोणी-श्रीमंतांस न जो लवला
ज्या दिशेस मुख फिरवावें
तेजाचे किरण पडावे
डोळे हे दिपुनी जावे
वैभव-रवि होता चढता-एक काळ ऐसा होता ७
गारांचा पाउस बरवा-बरवी न वृष्टि शिंद्यांची
स्वारी जी होळकरांची-त्याहून बरी व्याघ्राची
धडगाति ना यद्दैवाची-त्यांनाच गांठ फडक्यांची
ज्यांची शत्रूंना भीति
अत्यंत वाटली चित्तीं
गेल्या गेल्या त्या मूर्ति
तोंडानें बोला आतां-एक काळ ऐसा होता ८

"हर हिर!" गर्जोनी गेला-ध्वनि दोन्हीही टोंकाशीं
हर देई याची साक्ष-रामेश्वर काशीवासी
ऐकाया येइल काय?-रवि रोज येइ उदयासी
गिरिशिखरावर जाऊन
रणतीर्थांना पाहून
स्थिति एकंदर जाणून
चंडांशुहि स्मरतो बुडतां-एक काळ ऐसा होता ९

---

## "एक काळ ऐसा होता"

### भाग ४ था.

कोरेगांवाच्या पगड्या-खुंटीवर झळकत होत्या
अष्ट्याच्या संग्रामाच्या-तरवारी लटकत होत्या
बंदुकीमुळें फुटलेल्या-गेहिं गेहिं ढाला होत्या
गाजविलेल्या शौर्याचा
ओढवलेल्या दैवाचा
इतिहास मुखें शेवटचा
सांगती शूर हळहळतां-एक काळ ऐसा होता १

पारतंत्र्य-शय्येवरती-भारत निजलेला होता
आंखडून सान्या नाड्या-दम छातीमध्यें होता
आकळ्या दिल्या जोरानें-शेवटीं अचेतन होतां
मिरतेला उठला बार

कानपुरीं झडली फैर
दिल्लीस माजलें वैर
दीप होय मोठा विझतां-एक काळ ऐसा होता २
झाले नानासाहेब-साहेबांचे तैं काळ!
केले तात्या टोप्यांनीं-टोपीवाल्यांचे हाल
झांशीची लक्ष्मी अबला-प्रबलांशीं करि कल्लोल
आला हाताशीं स्वर्ग
मिरवी जो तो निजगर्व
भूपाल ह्मणवती सर्व
कोणी न कुणाचा शास्ता-एक काळ ऐसा होता ३
मर्दांच्या मर्दुमकीचे-पोवाडे रचिले जातां-
लढवय्यांच्या नांवाची-ती थाप डफावर पडतां-
स्वातंत्र्याच्या काळाला-शाहिर हौसेनें गातां
तों सुधारणा नव आली
गेलेल्या वैभव-कालीं
भुरळ ती मनाला घाली
तिजला ही भुलली जनता-एक काळ ऐसा होता ४
देवधर्म मानुन झूट-घालावा भलता वाद
संध्यास्नानें राहोत-जावें नित हाटेलांत
भक्षावें तेथ अभक्ष्य-तें अपेय-पान करीत
डबक्यांतिल मंडुक जैसे
पंकिल भक्षोनी घोषें
डर डरती कटु आवेशें

बोलाव्या तैशा बाता—एक काळ ऐसा होता ५
परक्याची संस्कृति गावी-निंदावे वंद्य ऋषींना
आचार उचलुनी त्यांचे-हिणवावें साधुजनांना
देव्हारें मांडुन त्यांचें—हांसावें देव्हाऱ्यांना
आर्यांच्या सद्वेदांचा
आचार्यांच्या ग्रंथांचा
अभिमानहि नुरला साचा
पोषाखांतहि परवशता—एक काळ ऐसा होता ६
इंग्रजी शिकोनी थोडें-पुस्तकी ज्ञान मिळवावें
एखादी पदवी मिळतां-विद्वान ह्मणून मिरवावें
वाणीचें तांडव करितां-परशद्ब मधें घालावे
देशाच्या पोकळ गोष्टी
करितांना केवळ ओष्टीं
एकाला दुसरा पुष्टी
देई श्रम कांहिं न करितां—एक काळ ऐसा होता ७
विल्यम्चें ह्मणणें कीं-'कालिदास सत्कवि कसचा ?
मानिअर बोले त्यांला[1]-'कर्ता कृत्रिम कवितेचा'
आह्माला मान्य असाव्या—मत्सर-ग्रस्त तद्वाचा !
अमुच्या विद्वद्रत्नांना—
परके निंदित असतांना—
आह्मी तुकवाव्या माना !
ग्रंथही न केवळ बघतां—एक काळ ऐसा होता ८

---

१ कालिदासाला.

'शिव भूप लुटारू होता '-ढोलकें अशी बडवावें !
' अक्षर-ओळख त्या नव्हती '-तुण तुणें अशी ताणावें !!
' विश्वासघातकी होता '-सूरांत सूर मिसळावे !!!
मुकलों राज्याला जसें
मुकलों बुद्धीला तैसें
कोणी सांगितलें जैसें
मानावें तैसें चित्ता-एक काळ ऐसा होता ९
जोंवरी विष्णुशास्त्र्यांनीं-लेखणी उचलली नव्हती
लेखणी कशाची छे-हो !-स्वाभिमान दीपज्योती
जोंवरी लोकमान्यांची-निश्चयांत मूर्ती होती
निजपूर्वज-वंचक तोंची
आपुली खांच उदराची
भरण्यासाठीं स्वत्वाची
दिसले जैं विक्री करितां-एक काळ ऐसा होता १०

---

# "केवळ देशा करितां!"

स्वदेशा करितां लढतां लढतां समरांगणावर पतन पावलेल्या आपल्या पुत्रानें आपणास काय सांगितलें! असें बापानें गहिंवरून विचारिलें. तेव्हां अंतकाळीं जवळ असलेला त्याचा मित्र बापास त्या मृतवीराचें शेवटचें भाषण सांगत आहे

प्रिय पुत्र दिवंगत झाला-स्वातंत्र्य-रणीं लढतांना
तन्मित्रें शोकद-वार्ता-कथिली माता पितरांना
मातेची शुद्धी गेली-करि विलाप भगिनी नाना
'बाळ काय वदला अंतीं?'
पुसतसे तात शोकांतीं
कथि तदंत्य-वाणी तो ती
"जन्मुनी धन्य मी झालों-देशाच्या कामीं आलों" १
'शूरांच्या वंशीं शूर-वीरांच्या सुकुलीं वीर
मर्दांच्या पोटीं मर्द-धीरांच्या उदरीं धीर'
मज जागृति या वचनांची-देत होति ही समशेर
कुल देवी हीच भवानी
कुल-पुरुषांनीं वंदोनी
कुल भूषविलें सकलांनीं
तें यश रक्षाया झटलों-देशाच्या कामीं आलों २
उलटला रंग युद्धाचा-'घे मार' सुरू जैं झाली
स्मृति झाली तैं स्वजनांची-क्षण वृत्ती होय निराळी

तों "**केवळ देशा करितां**"-हीं ध्वजाक्षरें वाचीयलीं
तेव्हां पासुन खड्गानें
किति रक्त प्राशिलें नेणें
तें तेंच एकलें जाणें
मी कर्तव्यीं रमलेलों-देशाच्या कामीं आलों ३

ना प्रभाव या हातांचा-सारा जननी दुग्धाचा
ना विक्रम मद्देहाचा-आर्यांच्या कुलकीर्तींचा
नाचविला भगवाझेंडा-ज्यांनीं शिवछत्रपतींचा
माता पितरांची प्रीती
त्यांच्या ठायीं मद्भक्ती
तुटली उभयांची ग्रंथी
सेवेला त्यांच्या मुकलों-देशाच्या कामीं आलों ४

एकुलता होतों एक-माता पितरांनों तुमचा
कोमल हृदयाची भगिनी-बंधु मी एक प्रेमाचा
ऐकतांच मन्निधनाला-लोटेल पूर बाष्पाचा
पृथ्विराज पडला जेथें
तानाजी निजला जेथें
दाखवून निज शौर्यातें
स्वातंत्र्य रणीं त्या निजलों-देशाच्या कामीं आलों ५

मंदारपुष्प नव माला-घेवोनी निर्जर बाला
खेळवीत निजहास्याला-दाखवीत भृकुटी-लीला
वाद्यांच्या घेऊन ताला-वाजवीत घुंगुरमाळा

आला हा त्यांचा मेळा
दिसतसे स्पष्ट नयनाला
मित्रा ! जननी जनकाला—
जा कळीव; 'स्वर्गी गेलों—देशाच्या कामीं आलों" ६

हृदयावर ठेउन हात-शोकानें विव्हलतात
वर आकाशीं पाहात-वदला गद्गद कंठांत
'बाळा ! राखोनी नांव-केलें मज धन्य जगांत
देशाची आज्ञा होतां
जे केवळ प्राणाकरितां
कचरतील लढतां लढतां
तत्क्षणीं वाणी खळो—'देशाच्या कामीं आलों ७

REFBK-0002140
REFBK-0002140
2860